



राज्य निवडणूक आयोगाने 19 पक्षांची चिन्हे राखून ठेवली..
(पान २ वर)

दैनिक
# दिव्य वतन
जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



मुंबईत राष्ट्रवादी शरद पवार गटाला खिंडार:
(पान ८वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com सोमवार दिनांक २९ डिसेंबर २०२५ अंक : १४५ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८

## पर्यायी इंधन न वापरल्यास कठोर उत्सर्जन नियम लागू करणार – नितीन गडकरी



दिव्य वतन /वृत्तसेवा

नागपूर : केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी पर्यायी इंधनाच्या वापरावर ठाम भूमिका मांडत वाहनचालकांना कठोर उत्सर्जन नियमांचा इशारा दिला आहे. नागपुरात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी सांगितले की, पर्यायी इंधनांचा अवलंब करणे आता केवळ पर्याय नसून अत्यावश्यक बनले आहे. “मी वाहतूक मंत्री आहे, दंडुका घेऊन बसलो आहे,” असे स्पष्ट शब्दांत सांगत गडकरी यांनी पर्यायी इंधनाचा वापर न झाल्यास युरो-६सारखे कठोर उत्सर्जन नियम लागू करण्यात येतील, असा इशारा दिला. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय आणि औद्योगिक क्षेत्रात चर्चेला उधाण येण्याची शक्यता आहे. पर्यायी इंधनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडून आर्थिक प्रोत्साहन दिले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सध्या ट्रॅक्टर उत्पादक कंपन्यांनी १०० टक्के इथेनॉल तसेच सीएनजीवर चालणारे फ्लेक्स इंजिन ट्रॅक्टर विकसित केले आहेत. भविष्यात बांधकाम उपकरणांसाठी पर्यायी व जैवइंधनाचा वापर केल्यास संबंधितांना पाच टक्के अनुदान देण्यात येणार आहे. अलीकडेच तीन नवीन ट्रक बाजारात आणण्यात आले असून, त्यापैकी दोन ट्रकमध्ये डिझेल व पेट्रोलसोबत हायड्रोजनचा मिश्र वापर केला जात आहे, तर एक ट्रक पूर्णपणे हायड्रोजन इंधनावर चालतो. अशाच प्रकारचे प्रयोग कृषी आणि बांधकाम उपकरणांमध्येही सुरू असल्याचे गडकरी यांनी सांगितले. देशाचे भविष्य पर्यायी इंधन व जैवइंधनाशी निगडित असून, भारताला प्रगतीपथावर नेण्याचा हाच एकमेव शाश्वत मार्ग आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## मुंबई महापालिकेत अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा 'स्वबळाचा' नारा:३७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर



दिव्य वतन /वृत्तसंस्था

मुंबई - राज्यभरात महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजले असून, मुंबई महानगरपालिकेच्या रणांगणात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने मोठी आघाडी घेतली आहे. महायुतीपासून फारकत घेत मुंबईत स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेणाऱ्या राष्ट्रवादीने आज 37 उमेदवारांची पहिली यादी प्रसिद्ध केली. या निवडणुकीची संपूर्ण धुरा नवाब मलिक आणि आमदार सना मलिक यांच्या खांद्यावर सोपवण्यात आली असून, पक्षाने एकूण 100 जागा लढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जाहीर झालेल्या पहिल्या यादीतील उमेदवारांना उद्यापासूनच अधिकृत एबी फॉर्मचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती पक्षाकडून देण्यात आली आहे.या पहिल्या यादीत नवाब मलिक यांच्या कुटुंबातील तीन सदस्यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. यात त्यांचे बंधू कप्तान मलिक यांना प्रभाग क्रमांक 165 मधून, तर बहीण डॉ. सईदा खान यांना प्रभाग क्रमांक 168 मधून मैदानात उतरवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, कप्तान मलिक यांचा मूळ प्रभाग 168 हा महिलांसाठी राखीव झाल्याने, त्यांनी स्वतःसाठी नवीन प्रभाग निवडला असून त्यांच्या जागी आपली सून बुशरा नदीम मलिक यांना प्रभाग 170 मधून उमेदवारी दिली आहे.आमदारसना मलिक यांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस मुंबईत एकूण 100 उमेदवार उभे करणार आहे. पहिल्या 37 उमेदवारांची घोषणा झाली असून, उद्यापासूनच या उमेदवारांना 'एबी फॉर्म' चे वाटप केले जाणार आहे. महायुतीतील इतर मित्रपक्षांपासून फारकत घेत राष्ट्रवादीने स्वतंत्रपणे उमेदवार देण्यास सुरुवात केल्यामुळे मुंबई महापालिकेच्या रणधुमाळीत आता चुरस वाढली आहे.

## सोलापूरमध्ये एमआयएम पक्षाला मोठा धक्का

### प्रदेश कार्याध्यक्ष फारुख शाब्दिंचा राजीनामा, महापालिका निवडणुकीच्या तोंडावर मोठा निर्णय

दिव्य वतन /वृत्तसंस्था



मुंबई - महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असतानाच सोलापूरमध्ये एमआयएम पक्षाला मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष फारुख शाब्दि यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असून, त्यांच्या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यानंतर शाब्दि हे राज्यातील एमआयएमचे दुसरे सर्वात मोठे आणि वजनदार नेते मानले जात होते. ऐन निवडणुकीच्या तोंडावर शाब्दि यांनी घेतलेली ही माघार पक्षासाठी मोठी हानी मानली जात आहे.

फारुख शाब्दि यांनी सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून दोनवेळा निवडणूक लढवली होती. या दोन्ही निवडणुकांमध्ये त्यांचा पराभव झाला असला, तरी त्यांनी दुसऱ्या क्रमांकाची मोठी मते मिळवून आपली भक्कम पकड सिद्ध केली होती. त्यांच्याकडे सोलापूर शहराध्यक्ष, मुंबई शहराध्यक्ष आणि प्रदेश कार्याध्यक्ष अशा अत्यंत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या होत्या. मात्र, गेल्या काही काळापासून पक्षात सुरू असलेल्या अंतर्गत राजकारणाला कंटाळून त्यांनी अखेर पक्षाला सोडचिट्टी देण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

सोलापुरातील काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार एमआयएममध्ये

काँग्रेस पक्षाने सोलापूर आणि कोल्हापूर येथील उमेदवारांची यादी जाहीर केली असून कोल्हापुरात 48 तर सोलापूरमध्ये 20 उमेदवारांची पहिली यादी काँग्रेसने जाहीर केली होती. मात्र, सोलापूरमध्ये काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. पहिल्या यादीतील उमेदवाराने थेट एमआयएम पक्षात प्रवेश केला आहे. खासदार प्रणिती शिंदे यांच्या निकटवर्तीय समजल्या जाणाऱ्या फिरदोस पटेल यांनी एमआयएम पक्षात प्रवेश केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.



सोलापूरच्या प्रभाग क्रमांक 16 च्या काँग्रेसचे अधिकृत उमेदवार माजी नगरसेविका फिरदोस पटेल यांनी आज एमआयएममध्ये प्रवेश केला आहे. इच्छुकांची मुलाखत घेताना अपमानास्पद वागणूक दिल्याचे कारण फिरदोस पटेल यांनी पुढे केले आहे. एमआयएमचे प्रदेश कार्याध्यक्ष फारूख शाब्दि आणि निरीक्षक अन्वर सादात यांच्या उपस्थितीत फिरदोस पटेल यांनी प्रवेश केला आहे. फिरदोस पटेल या काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांच्या निकटवर्तीय मानल्या जातात. 2017 मध्ये सोलापूर महापालिकेत त्या निवडून आल्या होत्या.

## ४ प्रमुख धर्मस्थळांवर १० लाख लोक पोहोचण्याची शक्यता, तिरुपतीमध्ये टोकननेच दर्शन

दिव्य वतन /वृत्तसंस्था



नवी दिल्ली -देशातील 4 प्रमुख धर्मस्थळांमध्ये 31 डिसेंबर आणि 1 जानेवारी रोजी सुमारे 10 लाख भाविक पोहोचण्याचा अंदाज आहे. अशा परिस्थितीत या मंदिरांमध्ये यासाठी विशेष तयारी करण्यात आली आहे. तिरुपतीहून एम.एस. शंकर, कटराहून हारून रशीद, शिर्डीहून नवनाथ दिघे आणि अयोध्येहून अभिनव आनंद सिंह यांचा ग्राउंड रिपोर्ट वाचा…

आंध्र प्रदेशातील तिरुपती मंदिरात 30 डिसेंबरपासून 10 दिवसांचा वैकुंठ एकादशी उत्सव सुरू होणार आहे. याच दरम्यान एक जानेवारीही आहे, त्यामुळे तिरुमला तिरुपती देवस्थानम बोर्डाने गर्दी व्यवस्थापनाची व्यापक योजना तयार केली आहे. बोर्डाचे ACEO सी.एच. वेंकैया चौधरी यांनी सांगितले की, 24 ते 26 डिसेंबरपर्यंत सुमारे 2 लाख भक्त येथे आले.

या अचानक वाढलेल्या गर्दीमुळे रांगेतील परिसर, निवास सुविधा आणि पादचारी मार्गांवर खूप दबाव आला. त्यामुळे 29 ते 31 डिसेंबरसाठी 1.89 लाख दर्शन टोकन दिल्यानंतर काउंटर बंद करण्यात आले आहेत.

30 डिसेंबर ते 1 जानेवारीपर्यंत फक्त त्याच भाविकांना दर्शनाची परवानगी मिळेल, ज्यांच्याकडे ॲडव्हान्स बुकिंग केलेले वैध टोकन असेल. गेल्या वर्षी झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल उचलण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील शिर्डी येथील साईबाबांच्या दरबारात यावेळी 6 लाख भाविक येण्याचा अंदाज आहे. त्यामुळे साईबाबा संस्थानने निर्णय घेतला आहे की, 31 डिसेंबर रोजी साई मंदिर रात्रभर खुले राहील. त्यामुळे या दिवशी रात्री 10 वाजता होणारी शेजारती आणि 1 जानेवारी 2026 रोजी सकाळी 5:15 वाजता होणारी काकड आरती होणार नाही.

## दहिसरमध्ये तेजस्वी घोसाळकरांचा एल्गार!

### भाजपच्या तिकिटावर भरणार उमेदवारी अर्ज

दिव्य वतन /वृत्तसेवा



मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेने वेग घेतला असून, सर्वच राजकीय पक्षांनी आपले बालेकिल्ले शाबूत राखण्यासाठी कंबर कसली आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने 37 उमेदवारांची पहिली यादी जाहीर करून आघाडी घेतली असतानाच, आता भाजपनेही आपल्या रणनीतीनुसार उमेदवारांची नावे निश्चित करण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः दहिसर आणि मलबार हिल यांसारख्या महत्त्वाच्या मतदारसंघांत भाजपकडून उद्या शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार आहेत.

शिवसेना उबाठा पक्षातून नुकताच भाजपमध्ये प्रवेश केलेल्या तेजस्वी घोसाळकर या दहिसर येथील वॉर्ड क्रमांक 2 मधून उद्या आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. या निमित्ताने दहिसरमध्ये एका भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले असून, या माध्यमातून भाजप मोठे शक्तिप्रदर्शन करण्याच्या तयारीत आहे. उद्या उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आयोजित रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन खुद्द घोसाळकर यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून मतदारांना केले आहे.

दक्षिण मुंबईतील भाजपचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मलबार हिल विधानसभा मतदारसंघातून भाजपने चार जागांसाठी नावे निश्चित केली आहेत. यामध्ये अजय पाटील (वॉर्ड 214), संतोष ढाले (वॉर्ड 215), स्नेहल तेंडुलकर (वॉर्ड 218) आणि सन्नी सानप (वॉर्ड 219) हे चारही उमेदवार उद्या आपले उमेदवारी अर्ज दाखल करण्याची दाट शक्यता आहे.

## दोन गुजराती आपल्याला गिळायला निघालेत

### आता 'तुझं-माझं' करू नका, तुमची निष्ठा विकू नका; उद्धव ठाकरेंची शिवसैनिकांना भावनिक साद



दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई - राज्यातील महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजले असून 15 जानेवारी 2026 रोजी होणाऱ्या मतदानासाठी राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी युतीची घोषणा केली असून, मुंबईसह राज्यातील महापालिकांमध्ये आता 'ठाकरे' बंधूंचा करिष्मा पाहायला मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी भाजपवर घणाघाती टीका करतानाच, कार्यकर्त्यांना एकनिष्ठ राहण्याचे आवाहन केले. "दोन गुजराती आपल्याला गिळायला निघाले असताना आपण जर आपसात भांडत बसलो, तर ही लढाई न लढलेलीच बरी," अशा शब्दांत त्यांनी आपल्या संघर्षाची दिशा स्पष्ट केली.कार्यकर्त्यांना संबोधित करताना उद्धव ठाकरे भाजपविरोधात कमालीचे आक्रमक दिसले. ते म्हणाले, "भाजपला महाराष्ट्रात कोणी ओळखत नव्हते, आम्ही त्यांना राज्याच्या कानाकोपऱ्यात आणि खेडोपाडी नेले. आम्ही ज्यांना मोठे केले, आज तेच आमच्यावर वार करत आहेत. भाजपने केवळ युती तोडली नाही, तर ते आपल्याला संपवायला निघाले आहेत. इतकी वर्षे ज्यांनी आपला केवळ उपयोग करून घेतला, त्यांना धडा शिकवण्याची वेळ आता आली आहे."महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसोबत (मनसे) झालेल्या युतीबाबत बोलताना त्यांनी वास्तववादी भूमिका मांडली. "ज्यावेळी युती किंवा आघाडी असते, त्यावेळी १०० टक्के आपल्या मनासारखे घडत नाही. काही जागा आपल्या हक्काच्या असतात, पण नायलाजाने त्या मित्रपक्षासाठी सोडाव्या लागतात. मला माहिती आहे की काही ठिकाणी कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असेल, पण मुंबई आणि महाराष्ट्राच्या भल्यासाठी मी हा वाईटपणा घ्यायला तयार आहे. तुम्ही मात्र तुमची निष्ठा विकू नका," असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना केले.एकही माणूस फुटता कामा नये, कार्यकर्त्यांना साद

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात अत्यंत भावनिक आवाहन केले. "तुम्ही एकदा माझ्या खुर्चीत बसून बघा आणि समोरच्या चार माणसांना निवडून दाखवा, म्हणजे जबाबदारी काय असते हे समजेल. विभागप्रमुखांनी आणि शिवसैनिकांनी अजिबात डगमगून जाऊ नका. माझ्या महाराष्ट्राच्या भल्यासाठी मी जगाच्या नजरेत वाईट ठरलो तरी चालेल, पण आपली ताकद विखुरली जाता कामा नये," असे त्यांनी कार्यकर्त्यांना बजावून सांगितले.या युतीचा मुख्य उद्देश मुंबईवरील मराठी माणसाचे वर्चस्व टिकवून ठेवणे हाच आहे. राज ठाकरे यांनीही यापूर्वीच जाहीर केले आहे की, मुंबई महापालिकेवर पुन्हा एकदा मराठी माणसाचाच महापौर बसेल आणि तो आपल्या युतीचाच असेल. मुंबई कोणाही परक्याच्या हातात हिसकावू देणार नाही, असा ठाम निर्धार उद्धव ठाकरे यांनी केला.

### महत्त्वाचे...

#### किनगावराजा पोलिस स्टेशन येथे दोघा विरुद्ध पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल




सिंदखेडराजा : किनगावराजा पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावात दिनांक 23 डिसेंबर रोजी एका अल्पवयीन मुलीवर दोन अल्पवयीन मुलांनी अतिप्रसंग केल्याने पोस्को कायद्याअंतर्गत 24 डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुलीची आई वय 35 यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर मुलगी वय 11 वर्ष दुपारी दोन वाजेच्या सुमारास घरासमोर एकटी झाडझुड करत होती ,त्या वेळी घराशेजारी राहणारे अल्पवयीन दोघे मुले वय 14 वर्ष व 15 वर्ष तिच्या घरी गेले त्या पैकी एकाने मुलीवर लैंगिक अत्याचार केला असून दुसरा घरा समोर पहारा देत होता .ह्या अतिप्रसंगामुळे मुलीला वेदना होऊ लागल्याने पीडित मुलीने माझ्या दोन्ही मांड्याच्या मध्ये दुखत आहे असे आईस सांगितले ,यावरून आईला शंका आली परत मुलीला सर्व काही खरे सांग असे म्हटल्यावर पीडित मुलीने सर्व प्रकार कथन केला ,या सर्व प्रकाराची मुलीच्या आईने पोलिस स्टेशन किनगावराजा येथे तक्रार दाखल केली त्या नुसार पोलिसांनी अप.नंबर 354/2025कलम 64 (2)(i)65 (2),351 (3) 3 (5)BNS सह कलम 4.6. 17 पोक्सो नुसार किनगाव राजा पोलिस स्टेशन येथे दोन अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास ठाणेदार संजय मातोंडकर करत आहेत .

#### राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचा आठवा वर्धापन दिन




बुलढाणा - पत्रकारांच्या हक्कांसाठी, न्यायासाठी आणि स्वाभिमानासाठी सातत्याने संघर्ष करणाऱ्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचा आठवा वर्धापन दिन मंगळवार, 30 डिसेंबर 2025 रोजी ऐतिहासिक बुलढाणा जिल्ह्यात मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. हा वर्धापन दिन सोहळा राज्याध्यक्ष मा. विष्णू कंकाळ यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला असून, राज्य व केंद्र पातळीवरील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.या वर्धापन दिन कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार मा. संजय गायकवाड यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय आयुष मंत्री मा. प्रतापराव जाधव आणि महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा. आकाश फुंडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मा. विजय सूर्यवंशी असणार आहेत. आठ वर्षांच्या संघर्षमय वाटचालीचा लेखाजोखा मांडत ते पत्रकार संघटनेची भूमिका, ध्येयधोरणे व भावी दिशा स्पष्ट करणार आहेत.या वर्धापन दिन सोहळ्यात पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर मार्गदर्शन, संघटनेच्या वर्षभरातील कार्याचा आढावा, तसेच पत्रकार सन्मान व पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. पत्रकार संरक्षण कायदा, पत्रकार पेन्शन योजना, ग्रामीण पत्रकारांचे प्रश्न आणि अन्यायग्रस्त पत्रकारांच्या पाठीशी उभे राहण्याच्या संघटनेच्या भूमिकेवर यावेळी विशेष भर देण्यात येणार आहे.हा भव्य व ऐतिहासिक कार्यक्रम गर्दे सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, बुलढाणा येथे दुपारी 12 वाजता आयोजित करण्यात आला.

# राज्य निवडणूक आयोगाने १९ पक्षांची चिन्हे राखून ठेवली

## महापालिका निवडणुकीत अपक्षांना सफरचंद, बिस्कीटसह अनेक मुक्त चिन्हे

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**


नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. राज्य निवडणूक आयोगाने अपक्ष उमेदवारांसाठी तब्बल १९४ चिन्हे उपलब्ध करून दिली आहेत. यात खाद्यपदार्थांसह विविध प्रकारच्या चिन्हांचा समावेश आहे.

अपक्ष उमेदवारांना सफरचंद, बिस्कीट, पाव, केक, ढोबळीमिरची, फुल कोबी, नारळ, ऊस, आले, द्राक्ष, हिरवी मिरची, फणस, भेंडी, मका, भुईमूग, वाटाणे, पेर, अननस, कलिंगड, आक्रोड आणि जेवणाची थाळी यांसारखी चिन्हे निवडता येतील. वाहन आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची चिन्हे देखील मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत.

निवडणूक लढवणाऱ्या अपक्ष उमेदवारांना तसेच अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांना या मुक्त चिन्हांमधून निवड करता येणार आहे. राज्य निवडणूक आयोगाकडे मान्यता प्राप्त नसलेल्या पण नोंदणीकृत अशा ४१६ पक्षांनी नोंदणी केली आहे. त्यांना मान्यताप्राप्त पक्ष श्रेणीतील राखीव चिन्हे न देता स्वतंत्र चिन्हे दिली जाणार आहेत. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना त्यांच्या राखीव चिन्हांवरच उमेदवार उभे करण्याची मुभा राहील. राष्ट्रीय स्तरावरील पाच पक्ष, राज्यस्तरीय पाच पक्ष आणि इतर राज्यातील राज्यस्तरीय नऊ पक्षांची चिन्हे राखीव ठेवण्यात आली आहेत.

मतदारांना उमेदवाराचे नाव लक्षात ठेवणे नेहमीच सोपे नसते, परंतु निवडणूक चिन्ह सहज लक्षात राहते. यामुळे मतदारांना चिन्हावरून उमेदवाराला मतदान करणे सोपे जाते. अपक्ष उमेदवारांना अर्ज भरताना तीन मुक्त चिन्हे नमूद करणे बंधनकारक आहे. येत्या २ जानेवारी २०२६ रोजी अर्ज माघारीनंतर आणि त्यानंतर होणाऱ्या निवडणूक चिन्हांच्या वाटपाने ३ जानेवारी रोजी अंतिम चित्र स्पष्ट होईल.

चिन्ह वाटपासाठी विशिष्ट क्रम पाळला जातो. आघाड्या किंवा फ्रंट यांना मुक्त चिन्हांपैकी अग्रक्रमाने मागणी केलेली चिन्हे देण्यासाठी विचार केला जातो. मात्र, असे चिन्ह एकापेक्षा जास्त आघाडी/संघटना/फ्रंट यांनी प्रथम अग्रक्रमाने मागितल्यास चिठ्या टाकून निर्णय घेतला जातो. अपक्षांच्या वरती त्यांना प्राधान्य मिळू शकते. मुक्त चिन्हांपैकी वाटप झाल्यानंतर उर्वरित चिन्हे अपक्ष उमेदवारांना त्यांनी दिलेल्या अग्रक्रमाचा विचार करून दिली जातात.




## अमरावती संक्षिप्त

### शिवसेना ठाकरे गटाची पहिली यादी जाहीर



अमरावती - आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आपली पहिली अधिकृत यादी आज, रविवारी सायंकाळी जाहीर केली. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने ही घोषणा करण्यात आली असून, यामध्ये २० उमेदवारांचा समावेश आहे. जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांनी सांगितले की, शिवसेना या निवडणुकीत सुमारे ५५ जागांवर उमेदवार उभे करेल.शिवसेनेची (उबाठा) मनसे, काँग्रेस आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेससोबत सकारात्मक चर्चा झाली आहे. या चर्चेनुसार, एकूण ८७ जागांपैकी काही जागांवर मैत्रीपूर्ण लढत होणार असून, काही ठिकाणी एकमेकांना थेट पाठिंबा दिला जाईल.
यादीत समाविष्ट असलेल्या २० उमेदवारांची नावे आणि त्यांच्या प्रभागांची माहिती आहे:



### उद्योजक नितीन दळवी यांना गाडगेबाबा सेवा पुरस्कार

अमरावती -मुंबईचे उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते नितीन दळवी यांना गाडगेबाबा सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अमरावती येथील गाडगेबाबांच्या समाधी मंदिरात आयोजित पुण्यतिथी महोत्सवादरम्यान हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.संस्थेचे विश्वस्त आणि गाडगे महाराज मिशनचे उपाध्यक्ष बापूसाहेब देशमुख यांच्या हस्ते दळवी यांना स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन गौरवण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. अरविंदराव देशमुख, ह.भ.प. संदीप गिरी महाराज, डॉ. राजकुमार लंगडे, ह.भ.प. भरत महाराज रेडे, संस्थेचे व्यवस्थापक प्रकाश महात्मे, नागरवाडी येथील आश्रमाचे गजानन देशमुख, मेळघाटचे रमेश तोटे आणि सुधीर धोंगडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.नितीन दळवी यांनी गाडगेबाबांच्या सेवा संस्थानच्या विविध उपक्रमांना वेळोवेळी सहकार्य केले आहे. त्यांनी अमरावती जिल्ह्यातील गाडगे महाराज मिशनद्वारे संचालित विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरवले असून, गुणवंत विद्यार्थ्यांनाही पुरस्कृत केले आहे.

### श्रीमती काशीदेवी माहेश्वरी यांचे निधन



आमगाव :- शहरातील प्रसिद्ध व्यापारी व सामाजिक कार्यकर्ता गोकुल माहेश्वरी (फाफट ) यांची मातोश्री श्रीमती काशी देवी द्वारकाप्रसाद फाफट वय 86 वर्ष यांचा वृद्ध काळाने आज दिनांक 28 डिसेंबर 2025 ला दुपारी 4 वाजता निधन झाले असून यांची यांची अंतिम यात्रा उद्या दिनांक 29 डिसेंबर 2025 ला दुपारी 3 वाजे दरम्यान त्यांच्या निवासस्थान बनिया मोहल्ला आमगाव येथून निघणार आहे त्यांच्या अंतिम संस्कार सालेकसा रोड वाघ नदी येथे होणार आहे त्यांच्या मागे मुलं मुली नातवंड असा आप्त परिवार आहे

# आरएसएस शताब्दी वर्षात ऐतिहासिक संघटनात्मक बदल: 'प्रांत प्रचारक' पद रद्द

## आता 'संभाग' आणि 'राज्य प्रचारक' सांभाळणार धुरा

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**



नागपूर -राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) आपल्या शताब्दी वर्षात मोठे संघटनात्मक बदल करणार आहे. या बदलांनुसार, 'प्रांत प्रचारक' हे पद रद्द केले जाईल आणि त्याऐवजी 'संभाग प्रचारक' किंवा 'राज्य प्रचारक' अशी नवीन व्यवस्था लागू केली जाईल. यामुळे संघटन अधिक प्रभावी, कार्यक्षम आणि तळागाळापर्यंत मजबूत होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असताना हे महत्त्वाचे बदल करण्यात येत आहेत. सध्याची प्रांत प्रचारक व्यवस्था बदलून, त्यांच्या जागी संभाग प्रचारक नियुक्त केले जातील. संभाग प्रचारकांचे कार्यक्षेत्र सध्याच्या प्रांत प्रचारकांच्या तुलनेत मर्यादित असेल, ज्यामुळे कामात अधिक सुसूत्रता येईल.

या नव्या रचनेनुसार, प्रत्येक राज्यासाठी एक 'राज्य प्रचारक' असेल. साधारणतः दोन प्रशासकीय मंडळे (कमिश्नरी) मिळून संघाचा एक 'संभाग' तयार केला जाईल. यामुळे राज्यांच्या प्रशासकीय रचनेनुसार कामाचा विस्तार करणे शक्य होईल.

उदाहरणार्थ, सध्या उत्तर प्रदेशात संघाचे ब्रज, अवध, मेरठ, कानपूर, काशी आणि गोरक्ष असे सहा प्रांत आहेत, ज्यात सहा प्रांत प्रचारक जबाबदारी सांभाळत आहेत. प्रशासकीय दृष्टिकोनातून उत्तर प्रदेशात एकूण १८ मंडळे असल्याने, नव्या व्यवस्थेनुसार येथे ९ संभाग प्रचारक असतील आणि संपूर्ण राज्यासाठी एक राज्य प्रचारक कार्यरत असेल.

यासोबतच, 'क्षेत्र प्रचारकां'ची संख्याही कमी होणार आहे. सध्या पूर्व उत्तर प्रदेशासाठी एक क्षेत्र प्रचारक आणि पश्चिम उत्तर प्रदेश व उत्तराखंडसाठी स्वतंत्र क्षेत्र प्रचारक आहेत. नव्या रचनेत या दोन्हींच्या जागी एकच क्षेत्र प्रचारक संपूर्ण उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडसाठी काम पाहणार आहे. मात्र, या दोन्ही राज्यांचे राज्य प्रचारक स्वतंत्र असतील.

त्याचप्रमाणे, सध्या राजस्थानसाठी एक स्वतंत्र क्षेत्र प्रचारक आहे आणि उत्तर क्षेत्रासाठी (दिल्ली, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, हरियाणा, पंजाब) वेगळा क्षेत्र प्रचारक आहे. नव्या व्यवस्थेनुसार, राजस्थानलाही संघाच्या दृष्टीने उत्तर क्षेत्रात समाविष्ट करण्यात येणार असून, या संपूर्ण भागासाठी एकच क्षेत्र प्रचारक असेल.

सध्या देशभरात संघात ११ क्षेत्र प्रचारक कार्यरत आहेत. नव्या रचनेनंतर ही संख्या ९ वर येईल,

# काँग्रेसचा 'मिशन 100 नगरसेवक'चा दणदणीत शुभारंभ

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**



नागपूर : नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा स्थापना दिवस आज दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी देवडीया काँग्रेस भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा केला. याच कार्यक्रमात नागपूर महानगरपालिका निवडणूक–२०२६ साठी काँग्रेसच्या 'मिशन १०० नगरसेवक' या महत्त्वाकांक्षी मोहिमेचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी नागपूर शहर काँग्रेस अध्यक्ष व पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित करताना, काँग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्याने वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून संघटितपणे काम करावे आणि मिशन १०० नगरसेवक यशस्वी करून नागपूर महानगरपालिकेत काँग्रेसची सत्ता प्रस्थापित करावी, असे ठाम आवाहन केले. आमदार ठाकरे म्हणाले, "गेल्या १५ वर्षांत भाजपच्या अपयशी, भ्रष्ट आणि नागरिकविरोधी कारभारामुळे नागपूर शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधांसाठीही संघर्ष करावा लागत आहे. नागपूरकरांच्या सर्व समस्यांवर ठोस उपाय देण्याची ताकद आणि इच्छाशक्ती केवळ काँग्रेसकडेच आहे. यावेळी १,५०० हून अधिक कार्यकर्त्यांनी उमेदवारी अर्ज सादर केले आहेत, मात्र जागा केवळ १५१ आहेत. त्यामुळे सर्वांनी मनाचा मोठेपणा दाखवून काँग्रेसने ज्या उमेदवारांना तिकीट दिले आहे, त्यांच्या विजयासाठी एकदिलाने काम करावे." कार्यक्रम आमदार विकास ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी सर्वप्रथम झेंडावंदन करून काँग्रेस पक्षाच्या गौरवशाली इतिहासाला अभिवादन करण्यात आले.

स्थापना दिवसाचे औचित्य साधत, महासचिव विजय गायकी यांच्या नेतृत्वाखाली १५२ जणांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. आमदार विकास ठाकरे यांनी सर्व नवप्रवेशितांचे काँग्रेसचा दुपट्टा परिधान करून मनापासून स्वागत केले. या कार्यक्रमाला आमदार अभिजीत वंजारी, अतुल कोटेचा, अतुल लोंढे, उमाकांत अग्निहोत्री, प्रशांत धवड, संजय महाकाळकर, गिरीश पांडव, बंटी शेळके, प्रा. दिनेश बानाबाकोडे, प्रविण आगरे, इरशाद अली, वसीम खान, रमेश पुणेकर यांच्यासह काँग्रेसचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन परमेश्वर राऊत यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. दिनेश बानाबाकोडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अब्दुल नियाज नाजू, शिवशंकर रणदिवे, दामोधर धर्माळे, ॲड. अभय रणदिवे, अप्पा मोहिते, परमेश्वर राऊत, निखिल धांडे, राजेश साखरकर, गोपाळ पत्तम, ॲड. विद्याधर त्रिपाठी, रीमा चव्हाण, वंदना मेश्राम, सुवर्णा धर्माळे तसेच डॉ. आघाव यांनी विशेष परिश्रम घेतले.



# बांगलादेशातील हिंदूंच्या रक्षणासाठी भारताने ठोस व धडक कारवाई करावी! – हिंदू जनजागृती समिती

## बांगलादेशातील हिंदूबहुल भागात स्वतंत्र राष्ट्र स्थापनेसाठी पुढाकार घेण्याची मागणी

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**



नागपूर - बांगलादेशातील हिंदूंवर सातत्याने होत असलेले अत्याचार, हत्या व धार्मिक छळ रोखण्यासाठी भारत सरकारने अमेरिकेप्रमाणे थेट व ठोस धडक कारवाई करावी, तसेच तेथील हिंदूबहुल भागात हिंदूंसाठी स्वतंत्र राष्ट्राच्या स्थापनेसाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बांगलादेशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदूंवर योजनाबद्ध पद्धतीने अत्याचार केले जात असून, त्यांच्या मठ, मंदिरे व मालमत्तांचे विध्वंस करण्यासाठी जिहादी कट रचण्यात येत आहे. अलीकडील काळात बांगलादेशातील हिंसाचारात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून, हिंदू समाजाच्या मूलभूत मानवाधिकारांचे सर्रास उल्लंघन होत आहे. हिंदूंचे अस्तित्वच नष्ट करण्याच्या हेतूने राबवली जाणारी ही एक सुनियोजित 'जिहादी योजना' असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ज्याप्रमाणे अमेरिकेने नैजीरीयातील ख्रिस्चान्नांच्या रक्षणासाठी कारवाई केली तशीच भारताने बांगलादेश सरकारवर कूटनीतिक दबाव टाकत ठोस उपाययोजना कराव्यात, तसेच गरज भासल्यास धडक धोरणात्मक कारवाई करून तेथील हिंदूंचे रक्षण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच बांगलादेशातील हिंदूबहुल प्रदेशात स्वतंत्र हिंदू राष्ट्राच्या स्थापनेसाठी भारताने आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढाकार घ्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हे निवेदन नागपूरचे उपजिल्हाधिकारी श्री. अनुप खांडे यांना सादर करण्यात आले. केंद्र शासनाने या विषयाची तातडीने दखल घेऊन कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

याप्रसंगी महाराष्ट्र मंदिर महासंघाचे आशिष नागपूरकर, चित्पावन ब्राह्मण संघाचे श्री. उमाकांत रानडे, हिंदू जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक अतुल अर्वेंला, हिंदुत्वनिष्ठ श्री. लक्ष्मण पोटे, श्री. अभेंद्र कठाळे तसेच अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# हेच का तुमचे दर्जेदार काम!

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**



खापा - नरखेड तालुक्यातील भरपुरश्या गावांमध्ये मागील महिन्यात मोठ्या थाटा माटाने आरोग्य उपकेंद्राचे उदघाटन समारंभ आटोपले. समारंभ आटोपताच लगेच तातडीने बांधकाम देखील सुरु करण्यात आले आहे.

अश्यातच नरखेड तालुक्यामध्ये असणारे गाव खापा घुडन येथे देखील नव्याने आरोग्य उपाकेंद्राचे काम मोठ्या जलध गतीने सुरु आहे, पण येथे सुरु असलेले काम हे योग्य पद्धतीचे नसल्याचे दिसून येत असल्या संदर्भात गावाकऱ्यांचे म्हणणे आहे. बांधकामाचा मुख्य जमिनीलगत असलेला आडवा टाकण्यात आलेला कॉलम हा पुरेपूर आडवा तिडवा असल्याचे दिसून येते. आणी हे लपविण्यासाठी येथील कामगारांकडून थातूर मातुर यावरच लिफा पोती केल्याचे निदर्शनास येते. एवढेच काय त्याच लागत उभा करण्यात आलेला बीम देखील कुठे कमी तर कुठे जास्त असा पद्धतीचा दिसून येतो.

तर भरपुरश्या जागी सेंट्रिन चा अभाव असल्यासारखे सेंट्रिंग च्या जागी तेथीलच विटाची मदत घेत असल्याचे दिसून येते. एकीकडे भारतीयजनता पार्टीचे सरकार मोठा गावोगावा करीत सांगत असतात की आमच्या कार्यकाळात कुठल्याही कामात दर्जाहीन काम होणार नाही. टीकाऊ कामाची मोठ्या आवाजात आस्वासाने यांच्या वतीने दिली जातात. पण असेच कामे होत राहिली तर सर्वसामान्यांना पडणार मोठा गहन प्रश्न हा आहे की " हेच काय तुमचे दर्जेदार काम...

# किरकोळ वादातून अनर्थ, दारुच्या नशेत शेजाऱ्याचा महिलेवर हल्ला

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : नागपूर जिल्ह्यातील उमरेड शहरात काल शनिवारी दुपारी घडलेल्या दुहेरी हत्याकांडाने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. गांगापूर कालवा परिसरातील झोपडपट्टीत दारूच्या नशेत असलेल्या शेजाऱ्याने किरकोळ वादातून माय-लेकींच्या डोक्यावर लाकडी दांड्याने जोरदार वार करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत पार्वता शंकर फुकट (वय 65) आणि त्यांची मुलगी संगीता वसंता रिठे (वय 40), दोघीही रा. गांगापूर, उमरेड यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या प्रकरणातील आरोपी नितेश किसन ठाकरे (वय 31), रा. गांगापूर झोपडपट्टी, उमरेड याला पोलिसांनी तात्काळ अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी आणि मृतक माय-लेकी शेजारी राहत होते. आरोपी नितेशला दारूचे व्यसन असून तो नशेत वारंवार शेजाऱ्यांशी वाद घालत असल्याची माहिती आहे. यापूर्वीही आरोपी आणि मृतकांमध्ये अनेकदा वाद झाले होते. काल शनिवारी दुपारी सुमारे 12.30 वाजताच्या सुमारास गांगापूर झोपडपट्टीतील मृतकांच्या राहत्या घरासमोर आरोपी नितेश आणि पार्वता फुकट यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. हा वाद पाहता पाहता विकोपाला गेला. वादाच्या भरात दारूच्या नशेत असलेल्या नितेशने जवळच असलेला लाकडी दांडा उचलला आणि पार्वता फुकट यांच्या डोक्यावर जोरदार वार केला. यात आईचा आवाज ऐकताच आईला वाचवण्यासाठी मुलगी संगीता रिठे तीला वाचवण्यासाठी मध्ये पडली असता आरोपीने तिच्याही डोक्यावर वार केले. या हल्ल्यात दोघीही रक्ताच्या थारोळ्यात खाली पडल्या आणि घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला.

परिसरात तणावाचं वातावरण

घटनेची माहिती मिळताच उमरेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनाजी जळक यांच्यासह पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले. याप्रकरणी फिर्यादी सौ. स्मिता पंकज जुमडे (वय 36) यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम 103 (1) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



## महत्त्वाचे...

### दोन सरपंच, तीन उपसरपंचांसाठी मतदान




अमरावती जिल्ह्यात आज (सोमवार, २९ डिसेंबर) दोन सरपंच आणि तीन उपसरपंचांसाठी निवडणूक होणार आहे. दर्यापूर तालुक्यातील लोतवाडा आणि भातकुली तालुक्यातील नांदेड (खुर्द) येथील सरपंचपदासाठी मतदान होईल. तसेच, दर्यापूर तालुक्यातील घडा, अचलपूर तालुक्यातील वासनी (बु) आणि लोतवाडा येथील उपसरपंचपदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडेल. या निवडणुकांसाठी मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी संबंधित तीनही तालुक्यांच्या तहसीलदारांना प्राधिकृत केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ११ वाजता त्या-त्या ठिकाणी बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.लोतवाडा ग्रामपंचायतीत आठ सदस्य आहेत, त्यापैकी सध्या सहाच कार्यरत आहेत. एक पद राजीनाम्यामुळे तर दुसरे अपात्र ठरल्याने रिक्त झाले आहे. नांदेड (खुर्द) येथील सरपंचपद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी आरक्षित आहे, तर लोतवाडा येथील सरपंचपद कोणत्याही संवर्गातील महिलेसाठी खुले आहे.उपसरपंच पदासाठी कोणतेही आरक्षण नसते. लोतवाडा, घडा आणि वासनी (बु) येथील उपसरपंचांनी विविध कारणांमुळे राजीनामे दिल्याने ही तिन्ही पदे रिक्त झाली आहेत. आजच्या बैठकीदरम्यान या पदांसाठीही नवीन प्रतिनिधींची निवड केली जाईल.

### महागाव कृउबात भाजपाला शिंदेसेनेकडून धोबीपछाड



महागाव -कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापतीपद वाचाविण्याचा अटोकाट प्रयत्न करूनही शेवटी भाजपाला तोंडघशी पडावे लागले असून, १५ संचालकांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केल्यामुळे गुलाबराव लोभा जाधव यांना सभापती पदावरून पायउतार व्हावे लागले आहे. अडीच वर्षांपूर्वी काँग्रेस, शिवसेना महाविकास आघाडीने महागाव नगरपंचायत मध्ये भाजपाची सत्ता उलथून सत्ता सिंहासन काबीज केले. आठवड्यापूर्वी उमरखेड नगर परिषदेच्या सर्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस प्रणित जनशक्ती पॅनलने भाजपाचा धुवा उडवला.त्या पाठोपाठ आज महागाव बाजार समितीत पुन्हा भाजपाची नाचक्की झाली आणि सभापती पदावरून गुलाबराव जाधव यांना धक्का देत शिवसेना शिंदे गटाचे रवी पवार यांनी बाजी मारली. लवकरच ते सभापती पदावर आरुढ होतील असे संकेत आहेत. महागाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ''अर्थकारणाच्या'' मुद्द्यावरून सभापती व संचालकात पराकोटीचे मतभेद निर्माण झाले होते. नाराज संचालकांनी सभापती गुलाबराव जाधव यांना सत्ता सोपानावरून पायउतार करण्याचा चंग बांधला व अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. घोडेबाजारामुळे अविश्वास प्रस्तावाचे समीकरण बिघडू नये यासाठी १५ संचालक मागील १० दिवसांपासून ''जीवाचे इंदूर'' करण्यासाठी टूरवर गेले होते. अविश्वास प्रस्तावावर मतदान होण्याला अर्ध्या तासाचा अवधी शिल्लक असताना टूरवर गेलेले संचालक बाजार समितीच्या कार्यालयात पोहोचले. १५ संचालकांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केले. सभापती गुलाबराव जाधव, सुनीता पंजाबराव गावंडे आणि अंबादास भिमटे हे संचालक मतदानाला गैरहजर राहिले त्यामुळे १५ विरुद्ध शुन्य मतांनी अविश्वास ठराव पारित झाला. त्यानंतर संचालकांनी गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा केला. समितीचे उपसभापती रामेश्वर करपे यांचे कडे तूर्तास सभापती पदाचा प्रभार देण्यात आला आहे. या संचालकांनी केले मतदान या अविश्वास प्रस्तावासंदर्भात रामेश्वर आणि पुष्पाताई सिताराम ठाकरे या संचालकांनी मतदान केले. अविश्वासानंतर जल्लोष करतांना संचालक मंडळ दिसत आहे.

# लोणार सरोवराची पातळी ९ मीटरने वाढली, ८ मंदिरे बुडाली

## २०२० मध्ये झाले होते गुलाबी पाणी, ५ वर्षांनंतर पुन्हा निसर्गाचा चमत्कार; खारटपणा घटला

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

लोणार- लोणारमध्ये गत १०० वर्षांत अनेकदा अतिवृष्टी झाली. आमच्या घरादारांत पाणी शिरले, संसार पाण्यात गेला, मात्र लोणार सरोवराच्या काठावरील कमळजादेवीच्या मंदिराच्या पायऱ्यांना सरोवरातील पाण्याने कधी स्पर्श केला नाही. मात्र यंदा सरोवरातील पाणी एवढे वाढले की मंदिराच्या पायऱ्याच काय गाभाऱ्यातही पाणी शिरले. देवीच्या गळ्यापर्यंत पाणी पोहोचले आहे. फक्त कमळजादेवीच नव्हे तर काठावरील शेकडो वर्षांपूर्वीची १० पैकी ८ मंदिरे पाण्यात बुडाली. २५ ते ३० फूट (७ ते ९ मीटर) पाणी पातळी वाढल्याने भाविकांची मंदिरापर्यंतची पायवाट अन् दर्शनही बंद झाले. असे इतिहासात पहिल्यांदाच घडल्याचे लोणारचे ग्रामस्थ सांगत आहेत.

जगातील एकमेव अल्कली बेसॉल्ट खडकातील हे महाकाय विवर. सुमारे ५२,००० वर्षांपूर्वी उल्का आघाताने ते तयार झाल्याचे शास्त्रज्ञ सांगतात. हा नैसर्गिक चमत्कार व सरोवराच्या काठावर गोड तर आत खारे व आम्लारी (अल्कलाइन) पाणी या अद्वितीय रासायनिक गुणधर्मांमुळे हे ठिकाण जागतिक नकाशावर झळकते. मात्र आता आणखी एक चमत्कार झाला, तो म्हणजे सरोवराची अचानक वाढत असलेली जलपातळी.

लोणार संवर्धन विकास समितीचे माजी सदस्य प्रा. गजानन खरात सांगतात, २०२२ पासून गायमुख, पापाहरेश्वर, रामगया, सीता न्हाणी हे चार झरे दुप्पट क्षमतेने वाहताहेत. हे पाणी पूर्वीप्रमाणेच सरोवरात जातेय. पाण्याचा खारटपणा कमी होतोय. २०२० मध्ये पाण्याचा पीएच स्तर १०.५ ते ११ होता आता ८ ते ९ पर्यंत खाली आला आहे. या पाण्यात कधी मासे जीवंत राहू शकत नव्हते. काठावरील गोड्या पाण्यामुळे ते दिसू लागलेत.

धारातीर्थ, पापाहरेश्वर, सीताहरेश्वर, सीता न्हाणी या तीन झऱ्यांचे पाणी यज्ञेश्वरजवळ अडवून तेथून विद्युत पंपाने लिफ्ट करावे हा एक पर्याय आहे. रामगया झऱ्याचे पाणी विहिरीत घेऊन तेथून त्याचा उपसा करावा, असे केल्यास सरोवरात पाणी जाणार नाही व आपोआप जलपातळी घटेल. वाढत्या जलपातळीचा धोका गावाला नाही, कारण सरोवर खोल आहे आणि गाव वरच्या बाजूला आहे, मात्र ग्रामस्थांना चिंता आपल्या गतवैभवाची आहे. २०२० मध्ये या सरोवराचे पाणी गुलाबी झाल्याचा चमत्कार आम्ही अनुभवला आहे, तसाच अनुभव पुन्हा ५ वर्षांनी आला आहे. सरकारने लवकर दखल घेऊन यामागील कारणे शोधावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

पुरातत्त्व विभागाचे २ कर्मचारी सरोवराच्या काठावर बसले होते. त्यांनी सांगितले, यंदा नवरात्रोत्सवापासून जलपातळीत मोठी वाढ होत आहे. २० ते ३० फूट पाणी मंदिराच्या दिशेने घुसले. देवीच्या मंदिरासह काठावरील महादेवालाही पाण्याने पहिल्यांदाच अभिषेक घातला. यापूर्वी

आम्ही अनेक पावसाळे पाहिले मात्र सरोवर पातळी सोडत नव्हता. हे कसे काय होत आहे, ते आम्हालाही समजत नाही. येथील अभ्यासक सचिन कापुरे सांगतात या पाण्याचा पीएच (सामू) ४ महिन्यांपूर्वी १० होता तो आता ८ झाला आहे. मुसळधार पाऊस व लोणार शहराचे सांडपाणी थेट या सरोवरात सोडले जात असल्याने जलपातळीत झपाट्याने वाढ होत आहे. वन्यजीव विभागाचे अधिकारी चेतन राठोड सांगतात, आयआयटी मुंबईच्या टीमने सरोवराची पाहणी केली आहे. करार केल्यानंतर संशोधनाचे काम सुरू होऊ शकते.

**इतिहासात पहिल्यांदाच कमळजादेवी मंदिर १५ फूट पाण्यात; इतर २ मंदिरे पाण्याबाहेर**

२५ हजार लोकसंख्या असलेले लोणार गाव. जे पाणी असलेल्या भागापासून सुमारे साडेचार किमी अंतरावर उंचावर आहे. लोणार संरक्षण विकास समितीचे माजी सदस्य पी. गजानन खराते सांगतात की, कमळजादेवी मंदिर आता १५ फूट पाण्यात असून पाणी गर्भगृहापर्यंत पोहोचले आहे. यापूर्वी कधीही पाणी मंदिराच्या पायऱ्यांपर्यंतही गेले नव्हते. काठावरील फक्त २ मंदिरे पाण्याबाहेर आहेत. अनेक शास्त्रज्ञांनी येऊन पाहणी केली, पाणी वाढण्याचे कारण समजलेले नाही. हा नैसर्गिक चमत्कार अनुभवण्यासाठी दररोज शेकडो पर्यटक येत आहेत. विद्यार्थ्यांना सहलीसाठी येथे आणले जात आहे. हे सर्व जंगलातून नवीन रस्ता तयार करून यज्ञेश्वर व रामगयापर्यंत पोहोचत आहेत.



दिव्य मराठीच्या टीमला पुण्याचे डेक्कन कॉलेज, जळगावच्या भडगावचे विद्यार्थी याच रस्त्याने सरोवरापर्यंत जाताना दिसले.

सीएसआयआर-नीरी नागपूरचे डॉ. गजानन खडसे यांनी सांगितले की, २०२० मध्ये आम्ही पाण्याच्या नमुन्यांवर संशोधन केले होते. तेव्हा बाष्पीभवन आणि वाढत्या क्षारतेमुळे पाण्याच्या रासायनिक गुणधर्मांमध्ये बदल दिसून आला होता. आता जलस्तर वाढल्याची बाब समोर येत आहे. पावसाव्यतिरिक्त पाण्याचा तिथे दुसरा कोणताही स्त्रोत नाही. त्यामुळे सखोल संशोधनाची गरज आहे.

पुरातत्त्व विभागाचे अधिकारी डॉ. अरुण मलिक यांनी सांगितले की, दसऱ्यापर्यंत पाण्याखाली गेलेली मंदिरे बाहेर काढण्याचा प्रयत्न करू.

लोणार सरोवरात नवरात्रोत्सवापासून पाण्याची पातळी सातत्याने वाढत आहे. इतिहासात पहिल्यांदाच पाणी पातळी ७ ते ९ मीटरपर्यंत उंचावली आहे.

# अमरावती जिल्हा परिषदेची निवडणूक लांबणीवर

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

अमरावती- जिल्हा परिषदेची निवडणूक लांबणीवर पडणार आहे. आरक्षणाची मर्यादा 50 टक्क्यांहून अधिक झाल्यामुळे अमरावती जिल्हा परिषदेला पहिल्या टप्प्यातील निवडणुकांमधून वगळण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

अमरावती जिल्हा परिषदेतील आरक्षण 64 टक्क्यांवर पोहोचले आहे. राज्य निवडणूक आयोग महानगरपालिका निवडणुकांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचा पहिला टप्पा घोषित करणार आहे. मात्र, ज्या संस्थांमध्ये आरक्षण 50 टक्क्यांच्या मर्यादेत आहे, त्याच ठिकाणी निवडणुका घेतल्या जातील.

सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 31 जानेवारीपूर्वी पूर्ण करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगास दिले आहेत. परंतु, या निवडणुकांमध्ये आरक्षण 50 टक्क्यांच्या मर्यादेत असावे, अशी अटही न्यायालयाने घातली आहे.

राज्यातील एकूण 32 जिल्हा परिषदांपैकी केवळ 12 जिल्हा परिषदांमध्ये 50 टक्क्यांच्या आत आरक्षण आहे, तर 20 जिल्हा परिषदांमध्ये ते अधिक आहे. त्याचप्रमाणे, 336 पंचायत समित्यांपैकी 125 पंचायत समित्यांमध्ये 50 टक्के आरक्षणाची मर्यादा पाळण्यात आली आहे.

# चिमुकल्यांच्या आग्रहापुढे मुख्यमंत्रीही हतबल

## सेल्फी काढताच परिसरातील बालकांनी आनंदात केला जल्लोष

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

अमरावती:- चिमुकल्यांच्या हट्टापुढे भल्याभल्यांचे काही चालत नाही, म्हणतात ना तेच खरे आहे. आता हेच बघा ना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील चिमुकल्यांच्या आग्रहापुढे हतबल झालेले दिसले. त्यांना व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून चिमुकल्यासोबत छायाचित्र काढावेच लागले. चक्क राज्याच्या मुख्यमंत्र्यांसोबत आपण फोटो काढल्याचे समाधान व आनंद असा काही अवर्णनीय होता, की बालकांचे चेहरेच खुलले. त्यांचे पालकही आनंदले.नेहमी कामात व्यस्त राहणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी अनेकांना रांगेत तासन तास उभे राहावे लागते. कामापुढे त्यांना कशाचीही तमा नसते. मात्र, भाजपा नेते तुषार भारतीय यांच्या रवी नगर परिसरातील गणेश विहार, क्रमांक २, येथील निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी २७ रोजी दुपारी २.३० वाजताच्या सुमारास अचानक भेट दिली. (नियोजित कार्यक्रमात ही भेट नव्हती) त्यांचे स्वागत करण्यासाठी मोठ्या संख्येत भाजप पदाधिकारीही उपस्थित होते. तुषार भारतीय यांच्या घरी प्रिया भारतीय यांनी मुख्यमंत्र्यांचे औक्षण केले. यावेळी सुधीर भारतीय, शिरीष भारतीय व

{ उर्वरित पान ४

निवडणुक तयारीचा घेतला आढावा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुषार भारतीय यांच्या निवासस्थानी उपस्थितज जिल्हा निवडणूक प्रभारी आ.संजय कुटे व जयंत डेहनकर यांच्याकडून मनपा निवडणुकीच्या तयारीबाबत माहिती घेतली.

सोबतच त्यांनी शिवसेनेसोबतच्या युतीबाबतही विचारणा केली. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे रविवारी बैठकीसाठी येणार असून या बैठकीत प्रामुख्याने जागाबाबत वाटपाचा तिढा सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल असेही ते म्हणाले.



# शिवसेना (उद्धवसाहेब ठाकरे) नवनिर्वाचित नगरसेवक रफीकभाई बर्तनवाले यांचा सत्कार

**दिव्य वतन /प्रतिनिधी**



मलकापुर:- नगरपालिका निवडणुकीत शिवसेना (उबाठा) चे प्रभाग 9 ब मधील रफीकभाई बर्तनवाले निवडून आल्याबद्दल चिखली येथील शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख प्रा.नरुभाऊ खेडेकर यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्यात आयोजित कार्यक्रमात नवनिर्वाचित नगरसेवक रफीकभाई बर्तनवाले यांचा सत्कार करण्यात आला यावेळी माजी मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे,माजी आमदार धृपतराव सावळे,माजी आमदार रेखाताई खेडेकर,शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत, जिल्हाप्रमुख गजानन वाघ, सहसंपर्कप्रमुख दत्ताभाऊ पाटील, सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने,शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, जळगाव जामोद तालुकाप्रमुख संतोष दांडगे, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास,अल्पसंख्याक सेना उपजिल्हाप्रमुख सै.वसीम सै.रहीम, वाहतूक सेना शहरप्रमुख इम्रान लकी, खामगांव तालुकाप्रमुख श्रीराम खेलदार, किशोर राऊत, निलेश होनाळे,शेख.नाजीमभाई बर्तनवाले, शेख.शब्बीर शेख. बुढन,सै.रहीम सै.करीम सह आदिंची उपस्थिती होती.

# अमरावतीसाठी नवीन पाईपलाईनमुळे नेरपिंगळाईची जुनी जलवाहिनी फुटली

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

नेरपिंगळाई, मोर्शी तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतीपैकी एक असलेल्या नेरपिंगळाई गावात गेल्या तीन दिवसांपासून पाणीपुरवठा खंडित झाला आहे. अमरावतीसाठी नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू असताना जुनी जलवाहिनी फुटल्याने ही समस्या निर्माण झाली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (मजीप्रा) कथित दुर्लक्षामुळे ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

नेरपिंगळाई गावासाठी पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी पिंगळादेवी गड परिसरातून येते. याच मार्गाला समांतर अमरावतीसाठी नवीन मुख्य जलवाहिनी टाकण्याचे काम



सुरू आहे. या कामादरम्यान ५० ते ६० वर्षांपूर्वीची नेरपिंगळाईची जुनी सिमेंटची जलवाहिनी वारंवार फुटत आहे, ज्यामुळे पाणीपुरवठा खंडित होत आहे.ग्रामपंचायत अधिकारी विनोद मनवर यांनी दिलेल्या माहितीनुसार, यासंदर्भात मजीप्राच्या अमरावती येथील अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्याशी वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला होता. जुनी सिमेंटची जलवाहिनी निकामी होण्याची शक्यता आधीच कळवून ती बदलण्याची मागणीही करण्यात आली होती. मात्र, प्राधिकरणाने या मागणीला विरोध करत केवळ लिकेज दुरुस्ती करून पाणीपुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत.सुमारे एक महिन्यापूर्वीच ग्रामपंचायतीने अमरावतीला जाणाऱ्या जलवाहिनीचे काम सुरू करण्यापूर्वी नेरपिंगळाईची जुनी व निकामी जलवाहिनी बदलून नवीन टाकण्याची स्पष्ट भूमिका घेतली होती. मात्र, मजीप्राने या मागणीकडे दुर्लक्ष करत नवीन जलवाहिनी टाकण्यास नकार दिला. मजीप्राच्या अधिकाऱ्यांनी 'दिव्य मराठी'ला सांगितले की, ते कंत्राटदाराद्वारे लिकेजची दुरुस्ती करून देण्यास बांधील आहेत.

# करंज ऋषींच्या कारंजा नगरीत,नविन वर्षानिमित्त राहणार भाविकांची मांदियाळी

## "संत गजानन महाराज मंदिर,आद्यशक्ती श्री.कामाक्षादेवी मंदिर आणि श्री.गुरुमंदिर भाविकांनी गजबजणार."


**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

कारंजा (लाड) : स्कंद पुराणातील उल्लेखानुसार कारंजा नगरी ही अतिप्राचिन नगरी असून,प्रभू श्रीरामांचे गुरुवर्य वसिष्ठ ऋषींच्या,सप्तर्षी शिष्यांमधील करंजऋषींनी कारंजा (लाड) येथे श्री खोलेश्वर महादेवाची स्थापना करून, कारंजा नगरीची आणि ऋषी सरोवरची स्थापना केल्याचा इतिहास असून,येथील ऋषी सरोवर कमळ फुलांसाठी सुप्रसिद्ध आहे. अशा ह्या अतिप्राचिन ,ऐतिहासिक, धार्मिक, आध्यात्मिक,सांस्कृतिक नगरीत आद्यशक्ती श्री कामाक्षा देवीचे अतिप्राचिन मंदिर असून ह्याच श्री कामाक्षा देवीचे मुळपिठ आसाम मधील गोहाटी शहरात कामाख्यापिठ नावाने सर्वदूर परिचित असून कारंजा येथील श्री कामाक्षा देवीच्या दर्शनार्थ छत्रपती शिवराय येऊन गेल्याचा इतिहास आहे. त्याशिवाय येथे श्री दत्तात्रयाचे दुसरे अवतार गुरुमहाराज श्री नृसिंह सरस्वती स्वामी यांचा जन्म झालेला असून,त्यांचे पवित्र जन्मस्थळ श्री गुरुमंदिर या नावाने प्रचालीत असून,सद्यस्थितीत येथे श्री





गुरुमाऊलीचा पंचेचाळीस दिवशीय श्री जन्मोत्सव सुरु आहे.त्याखेरीज येथे शहर पोलीस स्टेशनच्या जागेत श्री संत गजानन महाराज स्वतः येवून गेल्याचे सत्य असून त्या जागेवर सद्गुरू गजानन महाराजांच्या भाविकांनी संत गजानन महाराज मंदिर निर्माण केले असून हे महाराजांचे हे मंदिर प्राचिन मंदिर म्हणून ओळखले जात असल्याने येथे सदैव भाविकांची वर्दळ असते.सध्या भाविक भक्तांना पर्वणी असलेला पौष माहिना असून,दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी पुत्रदा एकादशी आणि दि. ०१ जानेवारी २०२६ रोजी पौष गुरुवार आहे. हल्लीची युवा मंडळी आणि तरुण आबाल वृद्ध भारतिय संस्कृतीचा अंगीकार करीत असल्यामुळे,श्री दर्शनाने सरत्या वर्षाला निरोप आणि नुतन वर्षाचे स्वागत करीत असतात.त्यामुळे दि.३१ डिसेंबर २०२५ आणि दि. ०१ जानेवारी २०२६ रोजी कारंजा येथील श्री संत गजानन महाराज मंदिर, आद्यशक्ती श्री.कामाक्षा देवी मंदिर आणि श्री.गुरुमंदिर संस्थान मध्ये,देश-विदेशातील भाविकांची मांदियाळी राहणार असल्याचे वृत्त श्रींच्या भक्त परिवारातील आई श्री कामाक्षा माता मित्र मंडळाचे संजय कडोळे यांनी कळवीले आहे.



## सुपरस्टार राजेश खन्ना

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज जयंती. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला.

"बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा...जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता....." आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है....

we all miss you.....

राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे

## टाकीचे घाव सोसल्या शिवाय दगडाला ही देवपण येत नाही

प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाणे म्हणजेच आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीच्या विरोधात जाऊन एखादे वेगळे काम किंवा कार्य करणे,आणि मग अशा प्रकारचे कार्य करायचे असेल तर त्यामध्ये प्रथम समाजाचा विरोध पत्करण्याची ताकद माणसांमध्ये असावीच लागते.कारण जर यशाच्या गावाला जायचे असेल तर प्रथम अपयशाच्या, आणि काट्याकुट्यांच्या वाटेने प्रवास हा करावाच लागतो, आणि त्यामध्ये दुःख आणि वेदनाही अनंत असतात परंतु त्या पार केल्याशिवाय यशाची गोड फळे चाखायला मिळणार नाही, जणू त्या असह्य वेदना त्या कार्या विषयीची आंतरिक तळमळ, त्यात बर्याच वेळा घरच्यांकडून तर कधी समाजाकडून होणारा विरोध माणसाला ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी बळ देऊन खंबीर बनवत असतात.

प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाणे म्हणजे एक प्रकारे नदीचा चालू प्रवाह विरुद्ध दिशेने वळविणे आणि एवढ्या अखंड वाहणाऱ्या वळणाला रोखणे म्हणजे नक्कीच मोठा संघर्ष...जीवनाचे रान केल्याशिवाय हे काही सहज शक्य नाही हेआपल्याला माहीत आहे. आपण इतिहासामध्ये पण अनेक उदाहरणे पाहिलेली आहेत, प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जायचे असल्यास अनंत अडचणींना तोंड देऊन वेळप्रसंगी जीवाचे बलिदान ही झालेले आहे.. सावित्रीबाई फुले यांचे स्त्री मुक्तीचे कार्य असो,वा शिवबांचे हिंदवी स्वराज्य स्थापनेचे मां साहेबांच्या स्वप्नपूर्तीचे कार्य असो ..असे अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहे. समाजामध्ये अशा कार्यांना प्रथम कुणीही सहमती देत नाही.. चालत आलेल्या प्रवृत्तींना सहजासहजी विरोध करणे पूर्वजांना लवकर जमत नव्हते त्यामुळे विरोधातूनच सुरुवात करावी लागते,परंतु त्यासाठी आकाशाला गवसनी घालण्याची ताकद, मनाचा पक्का निर्धार माणसाच्या मनात असल्यास कोणतीही परिस्थिती येवो, तिला खंबीरपणे तोंड देण्याची ताकद ही माणसाला आपोआपच मिळते.परंतु, त्यामध्ये प्रचंड आत्मविश्वास असावा लागतो..

"अनंत आमुची ध्येयासक्ती अन् आशा किनारा तुला पामराला ...

माणसाच्या मनात एखादं कार्य पूर्ण करण्याची तीव्र इच्छा असल्यास तो कोणत्याही परिस्थितीला जुमानत नाही. जीवनात जुन्या वाटेवर अडचणी आल्याशिवाय नवीन वाटांचा शोध पण लागत नाही हेही तितकेच खरे. आपण पाहतो बागेतील वेली, वृक्षांना, फुलांनाही या सर्व परिस्थितीचा सामना करावाच लागतो. त्याशिवाय त्यांचेही जीवन फुलत नाही... आकर्षक ही वाटत नाही..आणि त्याशिवाय त्यांच्या जीवनाला सार्थकता ही प्राप्त होत नाही. त्यांनीही ऊन,वारा, पाऊस इत्यादी परिस्थितीचा सामना करून आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे.त्याचप्रमाणे माणसालाही आपली प्रगती, रक्षण आणि आपले अस्तित्व टिकून ठेवायचे असल्यास संघर्ष हा करावाच लागेल यासाठी वेळप्रसंगी हे प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाणे हे ही महत्त्वाचे ठरते.. आणि त्याशिवाय नवीन क्रांती ही घडून येत नाही...

प्रा.सौ. आशा सचिन भावसार,
जालना.

# नववर्षाचे स्वागत करा,जरा जपून!

इंग्रजीनवीन वर्ष आनंदाचा क्षण जरी असला तरी आपापल्या संस्कृतीच्या माध्यमातून नवीन वर्ष साजरे केले पाहिजे. कारण भारतात अनेक धर्म,अनेक पंथ, अनेक भाषा अशा विभिन्नतेतून अखंड भारताची निर्मिती झाली आहे. त्यामुळे पाश्चिमात्य देश कोणत्या पध्दतीने नवीन वर्ष साजरे करतात याकडे लक्ष न देता आपल्या संस्कृतीच्या व धर्माच्या आधारावर नवीन वर्षाचा कार्यक्रम साजरा करून नववर्षाचे स्वागत करावे. नववर्षाच्या निमित्ताने धर्म, संस्कृती, मानसन्मान,आदरतिथ्य यांच्या संगमातून नवीन वर्षाचे स्वागत करून जुन्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्ष सुख समृद्धीचे जावो अशी सर्वांनीच ईश्वरचरणी प्रार्थना करावी.कारण फक्त हुल्लडबाजी करून नवीन वर्ष साजरे होत नसुन कौटुंबिकतेच्या माध्यमातून साजरे केले तर याचा आनंद आगळावेगळा दिसून येईल व संपूर्ण कुटुंबात या दिवसाला एक आगळावेगळे स्वरूप येईल.काही युवा वर्ग नवीन वर्षाची मौजमस्ती फक्त नशा पाणी करून करतात व याचे गंभीर परिणाम त्या व्यक्तीला किंवा त्यांच्या कुटुंबीयांना भोगावे लागतात ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.त्यामुळे नवीन वर्षाचे स्वागत करतांना वाढत्या दुर्घटना पहाता मद्य पिवुन वाहन चालवु नये, वाहन चालवितांना मोबाईलचा वापर टाळावा, कोणालाही त्रास होणार नाही हे लक्षात घेऊन जल्लोष करावा. आपण २०२५ चा विचार केला तर या वर्षात आतंकवाद्यांनी मानवतेला काळीमा फासणारे दोन हल्ले केलेत यामध्ये २२ एप्रिल २०२५ ला पहलगाम येथील अंगावर शहारे येणारा हल्ला व १० नोव्हेंबर २०२५ ला दिल्ली येथील आतंकवादी हल्ला अत्यंत भयानक होता.त्यामुळे येणाऱ्या नवीन वर्ष लक्षात येता आतंकवादी कारवायापासुन सर्वांनीच सावध रहाणे गरजेचे आहे. कारण आतंकवादी आपल्या आनंदात जहर घोळु शकतात यालाही नाकारता येत नाही.३१ डिसेंबरला सरकारने




घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून आनंदाने नवीन वर्षाचे स्वागत व्हायला पाहिजे.कारण पोलिस विभाग आपल्याच संरक्षणाकरीता नियम बनवित असतात. अपघात होवू नये, अनुचित प्रकार घडू नये व ३१ डिसेंबर सर्वत्र शांततेत आणि आनंदात पार पडावा याच उद्देशाने पोलिस विभागाने सर्वसामान्यांच्या बचावासाठी काही अटी घालून दिलेल्या आहे त्याचे पालन व्हायलाच पाहिजे.कारण देशासह राज्यात दुर्घटनांचे प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढले आहे.याचे मुख्य कारण म्हणजे नियमांचे उल्लंघन करून वाहन चालविणे. यामुळेच देशासह राज्यात अनेक दुर्घटना रोज होतांना दिसतात. त्याचप्रमाणे राज्यासह देशात "हिट ऍंड रन" चे प्रमाण सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढल्याने दररोज दुर्घटना मोठ्या प्रमाणात होतांना दिसते आणि हा संपूर्ण प्रकार नशेमुळे होत असतो. त्यामुळे नवीन वर्षे साजरे करतांना सतर्कता बाळगुन साजरे करावे अन्यथा "आ बैल मुझे मार"अशी परिस्थिती होवू शकते आणि याचे गंभीर परिणाम आपल्याला व आपल्या परिवाराला भोगावे लागु शकतात.त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या दुर्घटना होणार नाही याची काळजी घेवूनच २०२६ चे स्वागत केले पाहिजे. जनतेला मी आग्रह करतो की २०२६ आला म्हणून जास्त उत्साहित होवू नका, पदोपदी सावधगिरी बाळगा.प्रत्येक धर्माच्या लोकांनी आपापल्या संस्कृतींचे अनुकरण करून नवीन वर्षाच्या निमित्ताने आगळावेगळे सांस्कृतिक कार्यक्रम अवश्य केले पाहिजे व मंदिर-मज्जीद, गुरूव्दारा,चर्च, बौद्ध विहार इत्यादी अनेक धार्मिक देवस्थानात जाणवु दर्शन घेणे अत्यंत गरजेचे आहे.यामुळे नवीन ऊर्जा निर्माण होते.

कारण इंग्रजी नवीन वर्ष असले तरी आपला धर्म व संस्कृती याला कुठेही खिंडार पडणार नाही व ठेच पोहचणार नाही याची काळजी घेऊन एक उत्साहाचा सण म्हणून सर्वांनीच नवीन वर्षाचे स्वागत करावे.यामुळे जगात नवीन वर्षाच्या निमित्ताने भारतातुन एक चांगला संदेश जाईल. भारताच्या दृष्टीकोनातून वर्षांच्या ३६५ दिवसांचा विचार केला तर आपल्याला कुठे ना कुठे प्रत्येक दिवसाला आगळेवेगळे महत्त्व दिसून येते आणि त्या पध्दतीने आपण साजरे करीत असतोच. त्यामुळे नवीन वर्षाला वेगळे रूप न देता आपापल्या संस्कृतींच्या माध्यमातून साजरे करावे हेच आपल्यासाठी नवीन वर्ष ठरेल.

कारण जगाच्या पाठीवर भारत विश्व शांतीचे प्रतीक आहे.त्याचपध्दती आपणही नवीन वर्ष साजरे केले पाहिजे. भारतात प्रत्येक राज्यात, प्रत्येक जिल्ह्यात मोठमोठी नामांकित पर्यटन स्थळे व धार्मिक स्थळे आहेत. याठीकानी जाऊन भजन-कीर्तनाचा आनंद घेवून नवीन वर्षाचे स्वागत केले तर एक आगळावेगळा उपक्रम दिसून येईल व नवीन चेतना जागृत होईल. आपण दुरच्या पर्यटन स्थळांना भेट देवू शकत नसेल तर जवळच्या पर्यटन स्थळांना भेट दिली पाहिजे.त्याचप्रमाणे नवीन वर्षाच्या निमित्ताने भजन, कीर्तन,पुजाअर्चना करून जगात चांगला संदेश जावा या उद्देशाने जनजागृती केली पाहिजे.घटते वनक्षेत्र, वाढते औद्योगिकीकरण,शहरीकरण आणि युद्धजन्य परिस्थिती यामुळे निर्माण होणारे बदलते हवामान यापासून राज्यासह देशात प्रदुषणाची मात्रा दिवसेंदिवस वाढत असून संपूर्ण सृष्टी धोक्याच्या उंबरठ्यावर आहे व सर्वांच्याच आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पृथ्वीच्या रक्षणासाठी वृक्षलागवड होने अत्यंत गरजेचे आहे. याकरीता नववर्षाच्या निमित्ताने भारतासह राज्यातील प्रत्येक व्यक्तीने एकतरी वृक्ष लावले पाहिजे व नवीन वर्षाचे स्वागत केले पाहिजे तेव्हा हा एक जागतिक उपक्रम होईल. देशात १४० कोटी लोकसंख्या आहे यातील अर्ध्या लोकसंख्येने म्हणजे ७० कोटी जनतेने नवीन वर्षाच्या निमित्ताने एक जरी झाड लावले तर संपूर्ण भारतात एकाच दिवशी ७० कोटी वृक्ष लागवडीचा विक्रम होईल आणि आपल्याला हीरवागार गालीचा दिसून येईल व एकाचवेळी करोडोंच्या संख्येने वृक्ष लागवड झालेली दिसेल. यामुळे "गुरांना चारा व मानवाला शुद्ध हवा" मिळण्यास मोठी मदत होईल. यामुळे प्रदूषणावर मात करून पृथ्वीचा समतोल राखण्यास मोठी मदत होईल. नवीन वर्षाचे स्वागत सर्वांनीच अवश्य केले पाहिजे परंतु जपून!आपण सर्वांनीच शपथ घेतली पाहिजे की नवीन वर्षात नवीन संकल्प, नवीन उमंग, नवी आशा, नवीन दिशा निर्माण व्हावी याच उद्देशाने पुढचे पाऊल टाकावे. राज्य सरकारनेपुढाकार घेऊन ३१डिसेंबर २०२५ च्या निमित्ताने व २०२६ च्या आगमनाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले पाहिजे.यातच नवीन वर्षाचे खरे स्वागत दिसून येईल व २०२६ या नवीन वर्षाचा वृक्षलागवडीचा आगळावेगळा उपक्रम सर्वांनीच अंगीकारला तर अनंत काळापर्यंत हा दिवस सर्वांच्याच स्मरणात राहील व याची सुवर्ण अक्षरात नोंद होईल.नवीन वर्षांच्या हार्दिक शुभेच्छा!जय हिंद !

**रमेश कृष्णराव लांजेवार**
स्वतंत्र पत्रकार,
मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.

# सर्वधर्म समभावाची शिकवण देणारे संत : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

महाराष्ट्र ही साधुसंताची भूमि म्हणून ओळखली जाते.अनेक संतानी या पवित्र मातीत अवतार घेतले आहेत. संत तुकाराम, एकनाथ, ज्ञानेश्वर, गाडगेबाबा या संताप्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज थोर संत होऊन गेले. तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ ला यावली जि. अमरावती येथे झाला. वडील बंडोजी इंगळे व आई मंजुळाबाई .तुकडोजी महाराजांचे पूर्ण नाव माणिक बंडोजी इंगळे.अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी अनेक कीर्तन व भजनांचा उपयोग केला. मराठी व हिंदी भाषेत काव्यलेखन केले. आत्मसंयमी विचार त्यांनी ग्रामगीता या काव्यातून मांडले. तुकडोजी महाराजांनी इ. स. १९३५ मध्ये मोझरी येथे गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली खंजिरी भजन प्रकारच्या माध्यमातून समाज प्रबोधन केले. तुकडोजी महाराज महान समाज सुधारक, स्वातंत्र्य सेनानी, कवी, गायक होते. तुकडोजी महाराजांचे गुरू आडकोजी महाराज होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता, अनुभव सागर, भजनावली, सेवा स्वधर्म, राष्ट्रीय भजनावली इत्यादी साहित्य रचना केली. अंधश्रद्धा व जातिव्यवस्था निर्मूलन करण्यासाठी कार्य केले. अंधश्रद्धा व जातिभेद समाजाला लागलेला कलंक आहे.तो कलंक धुवून काढण्यासाठी गावोगावी जाऊन समाज प्रबोधन करीत. आधुनिक काळातील एक महान संत म्हणून तुकडोजी महाराज यांची ओळख आहे. विदर्भ जरी जन्मभूमि असली तरी महाराष्ट्रभर फिरून समाज जागृती केली. राज्यचं नव्हे तर संपूर्ण देशभर प्रवास करून आध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन केले. जपान देशात जाऊन सर्वांना विश्वबंधुत्वाची शिकवण दिली. सन १९४२ भारत छोडो आंदोलनात त्यांना अटक झाली.

"आते है नाथ हमारे "

हे त्यांचे पद स्वातंत्र्य लढ्यात स्फूर्ती देणारे गीत होते. भारत हा खेड्यांचा देश आहे. खेडे म्हणजे ग्राम किंवा ग्रामीण भागातील लोकांचा विकास झाला पाहिजे. ग्रामीण विकास झाला की राष्ट्रीय विकास होतो. समाजातील सर्व प्रकारच्या लोकांचा विकास कसा करता येईल. त्यांचा उद्धार करण्यासाठी अहोरात्र योगदान दिले.ग्रामोन्नती, ग्रामकल्याण त्यांच्या विचार सरणीचा केंद्रबिंदू होता. संपूर्ण भारत देशातील खेड्यांची दैयनिय स्थितीचा विचार केला. खेडे गाव सुधारल्याशिवाय देश सुधारू शकत नाही. ही भावना मनात घर करून होती. खेडेगाव स्वयंपूर्ण कसे होईल याबद्दल उपाय योजना तयार करीत. देवाबद्दल भोळेपणा, जुनाट कालबाह्य अंधश्रद्धा नाहीशा व्हाव्यात. सर्वधर्म समभाव हे राष्ट्र संत तुकडोजी महाराजांचे विचार विश्वाचे वैशिष्ट्य होते. सामुदायिक प्रार्थना महाराजांना आवडत होती. तुकडोजी महाराज एकेश्वरवादाचे पुरस्कार करते होते. विवेकनिष्ठ जीवनदृष्टीवादी होते, धार्मिक कर्मकांडाला कडाडून विरोध केला. महिला उन्नती व्हावी म्हणून सतत कुटुंब, समाज, राष्ट्र व्यवस्था ही स्त्रीयांवर कशी अवलंबून असते हे कीर्तनातून जनसामान्यांना सांगत. स्त्रीला अज्ञानात, गुलामगिरीत ठेवणे अन्यायकारक आहे. देशाची युवा पिढी ही राष्ट्राची संपत्ती आहे. तरुण हे बलाची उपासना करणारे असावे.राष्ट्राचे रक्षण करण्याची जबाबदारी तरूण पिढीवर आहे. बल किंवा ताकदवान युवा शक्ती राष्ट्रीय मनोबल वाढवते. समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करून नीतिमान व सुसंस्कृत जनता कशी होईल ते महत्त्वाचे आहे.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज झोपडीत सुद्धा सर्व सुख मिळते हे सांगतात.

"राजा सजी महाली,सौख्ये
कधी मिळाली.|
ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत
माझ्या.||
भूमिवरी पडावे,ता-याकडे पहावे|
प्रभू नाम नित्य गावे, या झोपडीत
माझ्या.||
येता तरी सुखी या ,जाता तरी
सुखी जा|
कोणावरी ना बोझा या झोपडीत
माझ्या||

रत्नाकर बाबुराव पाटील
शिंगोली

# कर्तबगार, महत्वाकांक्षी आधुनिक काळातील भारतीय स्त्री: रितु(ऋतू) करिधाल!

भारतीय स्त्री म्हटले की कर्तबगार, मनमिळाऊ, महत्त्वाकांक्षी, तरीही मानवी जीवनाचे महत्त्व जाणणारी, इतरांचे प्रश्न समजून घेऊन स्वतःचे प्रश्न सोडवणारी, बंड पुकारतानाही आपल्या अपेक्षांचे ओझे कोणावर न पडू देणारी सोशिक स्त्रीची प्रतिमा समोर येते. तिच्यात कोणतीच कमतरता नाही असे नाही पण जे तिच्या जवळ आहे त्याची डोळसपणे जाण ठेवणारी अशी ही स्त्री. तिची झेप तिच्या पुरती, वैयक्तिक असली तरीही त्यामुळे एकंदरीत भारतीय स्त्रीला केवढे मोठे आकाश खुले झाले हे प्रत्येक स्त्रीला गौरवान्वित करणारे आहे. अशा काही स्त्रियांचा थोडक्यात अभ्यास करताना प्रत्येकीच्या यशस्वितेसाठी दिलेल्या संघर्षात, लढ्यात समाजातील इतर उदयोन्मुख व्यक्तिरेखांना प्रेरणा मिळेल असे काहीतरी हाती लागतेच! प्रगतीच्या वाटेत येणाऱ्या अडथळ्यांना अलगद पार करून प्रकाशमान यशाशी गळाभेट घेणाऱ्या काही कर्तृत्ववान स्त्रिया या नेहमीच सामान्यातील सामान्य स्त्रीलाही मार्गदर्शक ठरतात. अशाच ध्येयाने प्रेरित झालेल्या या भारतीय महिलेची यशोगाथा संक्षिप्त रूपाने समोर ठेवताना मन त्यांच्याप्रति वाटणाऱ्या अभिमानाने भरून जाते. रितू करिधाल आकाशातील ताऱ्यांकडे पाहता पाहता वैज्ञानिक होऊन देशाच्या मोठ्या मोठ्या अवकाशयानांच्या उड्डाणासाठी काम करते! चारचौघीं सारख्या दिसणारी ही किरणशलाका एका ध्येयाने प्रेरित होऊन जेंव्हा आगेकूच करू लागली तेंव्हा सा-यांचे डोळे दिपून गेले!

लहानपणी ग्रहताऱ्यांकडे आकर्षित होणारी रितू नेहमी त्या अथांग अंतरिक्षापल्याड काय दडलेले आहे याचा विचार करत असे. मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेली रितू गर्ल्स कॉलेजमध्ये अगदी साधेपणाने शिकली. पुढे लखनऊच्या विश्वविद्यालयातून पदवीपर्यंत शिक्षण घेतले. गेट परीक्षा पास झाल्यानंतर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस ला बंगलोर मध्ये प्रवेश घेऊन तेथे ती एअरोस्पेस इंजिनियर झाली. पुढे ती १९९७ मध्ये इस्त्रोशी जोडल्या गेली. चंद्रयान- २ ची मिशन डायरेक्टर रितू करीधाल अशा प्रकारे आयआयटी वगैरेच्या मागे न लागता साधेपणाने इस्त्रोची सीनियर सायंटिस्ट बनली. रितूने इसरो मध्ये अनेक महत्त्वाचे प्रोजेक्ट केले आहेत. ती मंगळयानाची डेप्युटी ऑपरेशन डायरेक्टर देखील होती. विज्ञान एक विषय नसून माझ्यासाठी उत्कटतेने सांभाळलेले वेड आहे असे ती मानते.

उत्तर प्रदेशातील लखनऊतील राजाजीपुरम् मध्ये रितु वाढली. आई-वडिलांचे निधन झालेले. छोट्या भावाची जबाबदारी, बहिणीची जबाबदारी, तिला दोन मुले ही आहेत. रितू सर्वांचा व्यवस्थित सांभाळ करते. देशाच्या महत्त्वाच्या प्रकल्पातील यश मिळत राहो हीच देवाला प्रार्थना! भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संघटन इस्त्रो सोबत काम करणारी भारतीय वैज्ञानिक असलेली एप्रिल 1975 ला जिचा जन्म झाला अशी अवघ्या ५० वर्षांची रितू भारताची रॉकेट वुमन म्हणून जाणली जाते. गोड हसतमुख चेहऱ्याची रितू करीधाल बहीण, भाऊ, मुले यांची काळजी घेऊन पती अविनाश श्रीवास्तव यांच्या सोबतच्या सुखी संसारात स्वकर्तव्याचे वहन करत करत देशासाठी एवढे महान कार्य करते! एक स्त्री म्हणून तिला त्यासाठी अनेक दिव्यातून जावे लागले असेल, पण जेव्हा राज्यपाल आनंदीबेन पटेल यांच्या हस्ते लखनऊ विद्यापीठात तिला मानद पदवी प्रदान करण्यात आली तेव्हा ही लखनऊची मुलगी विज्ञानकन्या साऱ्या देशाच्या गळ्यातल्या ताईत बनली! मुलगा आदित्य आणि मुलगी अनिशा हे त्यांच्या आईच्या कार्याच्या प्रकाशात तळपत राहतील.

चांद्रयान -२चे यशस्वी लँडिंग होऊ शकले नसले तरी त्यामागील अनेक शास्त्रज्ञांची मेहनत पुढील संशोधनासाठी मैलाचा दगड ठरणार आहे!

**सौ. सुवर्णा व्यंकट मुळजकर**
परभणी

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

## महत्त्वाचे...



### अमळनेर शिवसेना कार्यालयात सत्कार समारंभ संपन्न

अमळनेर -अमळनेर येथील नवनिर्वाचित नगरसेवक माजी नगरसेवक तथा विद्यमान नगरसेवक दादासाहेब पवार माजी नगरसेवक मुन्ना भाऊ शर्मा विद्यमान नगरसेविका कल्पना शर्मा यांची पती यांचा सत्कार शिवसेना मध्यवर्ती कार्यालय अमळनेर येथे तालुकाप्रमुख श्री सुरेश भाऊ पाटील यांनी नुकताच आपल्या कार्यालयात केला त्या ठिकाणी पुणे येथील नमिषदायमा शिवसेना कार्यकर्ते अनिल पाटील जिजा पाटील विनोद पाटील सर्व कार्यकर्त्यांनी पेढे घेऊन आनंद व्यक्त केला तालुक्यात शिवसेना मजबूत करण्यासाठी ग्रामीण भागापर्यंत शिवसेना शाखा स्थापून तालुका भगवामय करण्याचे प्रयत्न तालुका प्रमुख सुरेश पाटील हे करत आहेत असे मान्यवरांनी आपले मत व्यक्त करून अमळनेर शिवसेना तालुका प्रमुख यांच्या कामाचाही गौरव केला.

### मित्राची प्रेयसी गर्भवती झाली, रेप केस माझ्यावर चालली



मी मुकेश कुशवाहा, बिहारमधील दरभंगा जिल्ह्याचा रहिवासी. माझ्यावर 17 वर्षांच्या मुलीवर बलात्कार आणि पॉक्सो कायद्यांतर्गत खटला चालला. ती मुलगी माझ्या मित्राची प्रेयसी होती. मित्राने तिला गर्भवती केले होते, पण खटला माझ्यावर चालला.पोलिसांनी असा खटला तयार केला की निर्दोष व्यक्तीला तुरुंगात पाठवले गेले. सत्र न्यायालयाने 20 वर्षांची शिक्षा सुनावली. खटला लढण्यात माझ्या जमिनी विकल्या गेल्या. माझ्या वडिलांचा सर्व व्यवसाय उद्ध्वस्त झाला. माझ्यावर 'बलात्कार आरोपी'चा शिक्का लागला.तेव्हा मी 20 वर्षांचा होतो. तारुण्यात तुरुंगात गेलो. आता कदाचित म्हातारपणीच बाहेर येऊ शकेन असे वाटले. येईन की नाही, माहीत नाही. प्रकरण उच्च न्यायालयात पोहोचले. तेथे एका ऑडिओने संपूर्ण प्रकरण फिरवले आणि 5 वर्षांनंतर मी सन्मानाने निर्दोष मुक्त झालो. खटला लढताना माझे आयुष्य उद्ध्वस्त झाले. माझे शिक्षण सुटले. कोणत्याही गुन्ह्याशिवाय मी अनेक वर्षे तुरुंगात राहिलो.खरं तर, गोष्ट २०२० ची आहे. दरभंगा शहरापासून ५५ किलोमीटर दूर माझं गाव आहे- मौजमपुर. इथेच माझे दोन भाऊ, एक बहीण आणि आई-वडील यांच्यासह पाच लोकांचं कुटुंब राहत होतं. कोरोनाचा काळ होता. एक दिवस कळलं की शेजारची १७ वर्षांची मुलगी ३ महिन्यांपासून गर्भवती आहे.

### शहरासह ग्रामीण भागात छुप्या पद्धतीने नायलॉन मांजाची विक्री

संग्रामपूर -न्यायालयासह शासनाने नायलॉन व चायनीज मांजावर बंदी घातली असली तरी आजही पतंग उडवण्यासाठी शहरासह ग्रामीण भागात चोरी छुप्या पध्दतीने नायलॉन मांजाची सर्रास विक्री करण्यात येत आहे. परंतु या कडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने नागरिक संताप व्यक्त करत आहेत.नायलॉन व चायनीज मांजा हा सध्या केवळ पतंग उडवण्याचे साधन न राहता, नागरिकांच्या जीवावर उठलेला धारदार फास ठरत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. शासनाने तसेच उच्च न्यायालयाने नायलॉन व चायनीज मांजावर बंदी घातली असताना देखील काही ठिकाणी या जीवघेण्या मांजाचा सर्रास वापर सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. तालुक्यातील वडगाव वान येथे १६ डिसेंबर रोजी घडलेल्या घटनेने परिसर हादरून गेला होता.

# शहा म्हणाले- राहुल थकू नका, तुम्हाला तामिळनाडू-बंगालमध्येही हरायचे आहे

## राहुल गांधींना विकासाचे राजकारण समजत नाही, म्हणूनच ते वारंवार निवडणुका हरतात

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी सांगितले की, काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा निवडणुकीतील वारंवार पराभव हा विकासाचे राजकारण न समजल्याचा परिणाम आहे. ते म्हणाले- 'राहुल, तुम्ही आत्ताच थकू नका, पुढेही तुम्हाला पराभव पत्करावा लागणार आहे. तुम्ही पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्येही निवडणुका हरणार आहात. 2029 मध्ये पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भाजप पुन्हा एकदा सत्तेत येईल.'

अहमदाबादमधील एका कार्यक्रमात शहा म्हणाले की, काँग्रेसचे राजकारण देशाच्या विचारांशी जुळत नाही. त्यांनी आरोप केला की, राहुल गांधी विकास आणि सुशासन यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी कायदेशीर आणि तांत्रिक मुद्द्यांमध्ये गुंतलेले असतात.

शहा म्हणाले की, भाजपने विश्वास आणि जनतेच्या गरजा समजून राज्य केले, म्हणूनच त्यांना निवडणुकीत वारंवार जनादेश मिळाला. तर काँग्रेस सतत पराभूत होत आहे, कारण ती जनतेला पाठिंबा असलेल्या मुद्द्यांपासून दूर आहे.

राहुल गांधींनी संसदेत केलेल्या त्या टिप्पणीचा उल्लेख केला, ज्यात त्यांनी काँग्रेसच्या सततच्या निवडणुकीतील पराभवावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. शहा म्हणाले की, दोन सार्वजनिक कार्यक्रमांचे निकालच या प्रश्नाचे उत्तर देतात.

काँग्रेसने त्या सर्व धोरणात्मक निर्णयांना विरोध केला, ज्यांना जनतेचा पाठिंबा मिळाला. यात राम मंदिर, पाकिस्तानविरुद्ध एअर स्ट्राइक, बांगलादेशी घुसखोरांविरुद्ध कारवाई, कलम 370 रद्द करणे आणि काशीमध्ये मंदिर बांधकाम यांसारख्या निर्णयांचा समावेश आहे.

राहुल गांधी सामान्य लोकांच्या वास्तविक समस्या समजून घेण्याऐवजी SIR सारख्या मुद्द्यांना समजून घेण्यात गुंतलेले असतात. ते म्हणाले की, ही त्यांची जबाबदारी देखील नाही, तरीही ते याच विषयांमध्ये अडकलेले असतात.

जेव्हा तुम्ही प्रत्येक त्या निर्णयाला विरोध करता, ज्याला जनतेचा पाठिंबा मिळाला असेल, तेव्हा मते कुठून येणार? भाजपचे विकासावर आधारित राजकारण आणि संवेदनशील शासन मॉडेल जनतेशी थेट जोडलेले आहे.


अहमदाबादमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाने बनवलेल्या ड्रेनेज लाईनचे उद्घाटन

रविवारी अहमदाबादच्या पश्चिम भागात अमित शहा यांनी 27 किलोमीटर लांबीच्या नवीन ड्रेनेज लाईनचे उद्घाटन केले. ही लाईन रस्ता न खोदता, आधुनिक तंत्रज्ञानाने बनवण्यात आली आहे.

शहा यांनी याला अभियांत्रिकीचे उत्कृष्ट उदाहरण म्हटले. ते म्हणाले की, वणझर परिसरात 1973 नंतर ज्या लोकांनी सर्व काही गमावले होते, ते येथे येऊन स्थायिक झाले होते. सुमारे 50 वर्षांपासून अनेक कुटुंबे येथे राहत होती, परंतु त्यांच्या भूखंडाची कायदेशीर प्रक्रिया रखडली होती.

त्यांनी सांगितले की, आता ही समस्या सोडवण्यात आली आहे. सर्व फाईल्स पूर्ण करण्यात आल्या आहेत आणि आजपासून लोकांना त्यांचे भूखंड कायदेशीररित्या मिळाले आहेत. यामुळे हजारो कुटुंबांच्या जीवनात मोठा बदल होईल.

अमित शहा म्हणाले की, या ड्रेनेज प्रकल्पामुळे 9 वॉर्डांमधील सुमारे 15 लाख लोकांना फायदा होईल. 4500 सोसायट्यांमधील गटारांची जुनी समस्या संपली आहे. सुमारे 400 कोटी रुपये खर्चून हे काम पूर्ण करण्यात आले, ज्यामुळे लोकांच्या आरोग्याशी संबंधित समस्याही दूर होतील.



# माजी आमदारांचा आनंद म्हणजे "बेगाने की शादी मे अब्दुल्ला दिवाना"-आ.अनिल पाटील

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

अमळनेर- येथील पालिका निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचा नगराध्यक्ष निवडून आल्यानंतर माजी आमदारांनी जो आनंदोत्सव साजरा केला आहे तो आनंद म्हणजे "बेगाने की शादी मे अब्दुल्ला दिवाना"असा प्रकार असून तो उमेदवार कुणाच्या क्रेडिटवर निवडून आला याचे स्वतः आत्मपरीक्षण करावे, जनतेलाही ते ठाऊक असल्याने त्यांना सांगण्याची मुळीच गरज नाही असा टोला माजी मंत्री तथा आ.अनिल भाईदास पाटील यांनी माजी आमदारांना उद्देशून लगावला आहे.

यासंदर्भात आमदार पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की या निवडणुकीत आमच्यासोबत कोण होते आणि कोण नव्हते हे सांगण्याची गरज नसून जनताही दुधखुळी नाही. खासदार स्मितताई वाघ व माजी आमदार साहेबराव दादा आमच्यासोबतच होते आणि यापुढेही राहतील त्याबाबत आम्हाला काय येथील जनतेलाही शंका नाही.तुमचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार स्वतःच्या क्रेडिटवर निवडून आला असला तरी जनतेचा कौल आम्ही स्वीकारला असून तुम्हाला शुभेच्छा देखील दिल्या आहेत. याउलट नंदुरबारच्याही विजयाचा तुम्ही गाजावाजा करतात परंतु नंदुरबार पालिका निवडणूकित तुमच्या दोनच जागा निवडल्यात आणि किती पडल्यात हे जनतेलाही जरा कळू द्या.तुमचा स्वतःचा पुत्र किती कमी मतांनी निवडला हे देखील येथील जनतेला कळू द्या. तेथे तुम्हाला यश मिळाले नाही याचे कारण म्हणजे नंदुरबार जी जनता तुम्हाला चांगली ओळखून असल्याने दुसऱ्यांदा तुम्हाला नाकारले आहे.आणि राहिला अमळनेरचा प्रश्न तर नगराध्यक्ष पदाचा विजय हे तुमचे वैयक्तिक यश नाहीच,त्यासोबतच नगरसेवक पदाचे जे तुमचे थोडेफार उमेदवार निवडून आले असतील ते तुमचे असो की आमचे त्यांनी आपापल्या स्वतः प्रभागात वर्षानुवर्ष केलेल्या



कामाचे फलित असून त्याचे क्रेडिट तुम्ही किंवा आम्ही घेण्याचे काहीही कारण नाही.

यापुढे असे आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा विकासाचे व्हिजन म्हणून शहरात विकास कामांसाठी मी अफाट पैसा आणला.शहरात दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी 24 बाय 7 योजना आणून तिचे कामही सुरू केले. रस्त्यांच्या कामासाठी मोठा निधी आणला. त्याकडे लक्ष केंद्रित करून ती कामे कशी लवकरात लवकर पूर्ण होतील त्यासाठी प्रयत्न करा.राहिलेले काम लवकर पूर्ण करा,तुमच्या नगरसेवकांना 2 ते 4 कोटींची कामे कशी मिळतील त्यासाठी प्रयत्न करा,निवडणूक व[illegible]ुसार प्रॉपर्टी टॅक्स कमी [illegible]सेल याशिवाय इतर महत्वपूर्ण विकास कामांसाठी आमचे पूर्ण सहकार्य असणार असल्याने ते पूर्ण करा.

तसेच माजी आमदारांना माझ्या मंत्री पदाबाबत चिंता आहे की धाक याबाबत मी देखील संभ्रमात आहे.परंतु त्यांनी काळजी करू नये मंत्रिपद आज मिळो की उद्या आजही या भुंमितील विकासाचा आलेख उंचविण्यासाठी आमदार म्हणुन मी सक्षम असून तुम्ही नंदुरबारकर असल्याने तिकडेच चांगले लक्ष घालावे. निवडणूक येते आणि जाते आणि राजकारणात स्तर बदलतही असतात येणाऱ्या काळात निश्चितच या भूमीच्या दृष्टीने चांगलं घडलेलं तुम्हाला दिसेल.त्यामुळे "वेट अँड वॉच" करा असा सल्ला आमदार अनिल पाटील यांनी देत मी जनतेसाठी रात्रंदिवस कधीही उभा राहील अशी ग्वाही देखील आमदार पाटील यांनी दिली आहे .

# मुंबई महापालिकेत काँग्रेस अन् 'वंचित बहुजन'चे ठरले

## भाजपला रोखण्यासाठी एकत्र लढणार, युतीची अधिकृत घोषणा

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा रणसंग्राम अधिकच अटीतटीचा होत असताना, राज्याच्या राजकारणात एक अत्यंत मोठी आणि निर्णायक घडामोडी समोर आली आहे. आगामी निवडणुकीसाठी काँग्रेस आणि प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडीने अखेर अधिकृतपणे हातमिळवणी केली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत या युतीची घोषणा केली. या नव्या समीकरणामुळे मुंबईच्या राजकीय पटलावर आता मोठी उलथापालथ होण्याची शक्यता निर्माण झाली असून, ही आघाडी केवळ सत्तेसाठी नसून भाजपला रोखण्यासाठी आणि संविधानाच्या रक्षणासाठी असल्याचे दोन्ही पक्षाच्या



नेत्यांनी स्पष्ट केले.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी बोलताना काँग्रेस आणि वंचित हे 'नैसर्गिक मित्र' असल्याचे नमूद केले. समविचारी पक्षांनी एकत्र येऊन लोकशाही मूल्ये जपली पाहिजेत, ही आमची सुरुवातीपासूनची भूमिका होती. याआधी नगरपरिषद निवडणुकीत काही ठिकाणी आम्ही एकत्रितपणे निवडणूक लढलो, त्याचे सकारात्मक परिणाम पाहायला मिळाले. आज तीच भूमिका पुढे नेण्यासाठी आम्ही 'समविचारी' म्हणून अधिकृतपणे एकत्र आलो आहोत. विशेष म्हणजे, आज काँग्रेसच्या स्थापना दिनीच हा ऐतिहासिक युतीचा योग जुळून आल्याने एका नव्या वैचारिक अध्यायाला सुरुवात झाली आहे, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी अत्यंत सांगितले.

# बांबूने काचा फोडल्या, दुकानाची नासधूस...

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

नवी मुंबई: नवी मुंबईच्या खारघर परिसरात शनिवारी रात्री मद्यधुंद तरुणाने घातलेल्या धिंगाण्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. खारघरमधील गोल्ड कॉईन वाईन मार्ट या वाईनशॉपमध्ये दारूच्या नशेत असलेल्या तरुणाने घुसखोरी करत मोठ्या प्रमाणावर तोडफोड केल्याची धक्कादायक घटना घडली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले अन् व्यापाऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली होती.

सदर प्रकरणामध्ये मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुण रात्री उशिराच्या सुमारास वाईनशॉपसमोर आला. तो पूर्णपणे मद्यधुंद अवस्थेत असल्याने त्याचे वर्तन आक्रमक होते. काही क्षणातच त्याने दुकानात प्रवेश करत लाकडी बांबूच्या सहाय्याने नामफलक, काचा तसेच दुकानातील साहित्याची जोरदार तोडफोड सुरू केली. या दरम्यान तरुण मोठ्याने ओरडत




शिवीगाळ करत असल्याने परिसरात एकच गदारोळ माजला. रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांनी हा प्रकार पाहताच घटनास्थळी गर्दी केली.

परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे लक्षात येताच स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी हस्तक्षेप केला. यावेळी संतप्त नागरिकांनी धाव घेत मद्यधुंद तरुणाला रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र तो अधिकच उग्र होत असल्याने अखेर नागरिकांनी त्याला चोप देत

# अमळनेरच्या वैष्णवी पाटील ची उल्लेखनीय शैक्षणिक वाटचाल

## ऑक्सफर्ड विद्यापीठ येथे झालेल्या डेटा परिषदेत संधी

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

अमळनेर-मेहनत, सातत्य आणि संधींचा योग्य वापर करत अमळनेर येथील वैष्णवी पाटील हिने आंतरराष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक यश मिळविले आहे. तिचा शैक्षणिक प्रवास अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. वैष्णवी हिने दहावीपर्यंतचे शिक्षण ग्लोबल व्ह्यू स्कूल, अमळनेर येथे पूर्ण केले. सन २०१८ मध्ये दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर तिने शासकीय पॉलिटेक्निक, जळगाव येथे माहिती तंत्रज्ञान शाखेत पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. गुणवत्तेच्या आधारे तिला शिक्षण शुल्क सवलत योजनेअंतर्गत प्रवेश मिळाला होता. यानंतर तिने पुणे येथील सिंहगड अभियांत्रिकी संस्थेत माहिती तंत्रज्ञान शाखेत अभियांत्रिकी पदवी मिळवली. संपूर्ण शिक्षण शिष्यवृत्तीच्या माध्यमातून पूर्ण झाले. पदवीदरम्यान नोकरीची संधी मिळूनही तिने उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार तिने इंग्लंडमधील लीड्स विद्यापीठात 'डेटा सायन्स आणि विश्लेषण' या विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला. हे विद्यापीठ जगातील अग्रगण्य शंभर विद्यापीठांपैकी



एक आहे. येथे तिला भारतीय उत्कृष्टता शिष्यवृत्ती मिळाली. पदव्युत्तर शिक्षणादरम्यान तिने युनायटेड किंगडममधील स्वयंसेवी संस्थांच्या टिकाव क्षमतेवर आधारित प्रबंध सादर केला. या प्रकल्पाचे सादरीकरण तिला ऑक्सफर्ड विद्यापीठ येथे झालेल्या डेटा परिषदेत करण्याची संधी मिळाली. लहान वयात वडिलांचे निधन झाल्यानंतरही आईने एकट्याने कुटुंब सांभाळले. या प्रवासात नातेवाइकांचा आणि कुटुंबीयांचा मोलाचा पाठिंबा लाभला. जिद्द, सातत्य आणि योग्य मार्गदर्शन असल्यास कोणतीही परिस्थिती अडथळा ठरत नाही, हे वैष्णवी पाटील हिच्या वाटचालीतून स्पष्ट होते.

# पुणे—नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्प जुन्याच मार्गाने राबवावा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई/पुणे -पुणे—नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्प हा २०१९ साली प्रस्तावित करण्यात आलेल्या जुन्या मार्गानेच कार्यान्वित करण्यात यावा, अशी लोकप्रतिनिधी व जनतेची भावना राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रीय रेल्वेमंत्र्यांपर्यंत पोहोचवावी, अशी मागणी जलसंपदा व पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. २०१९ मध्ये नारायणगाव—संगमनेर—अकोले—सिन्नर मार्गे तयार करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालावरच कार्यवाही व्हावी, याबाबत मंत्री विखे पाटील आग्रही आहेत. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन प्रकल्पाबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली असून, सद्यस्थिती पत्राद्वारेही मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. केंद्रीय रेल्वे विभागाने २०१९ साली पुणे—नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा प्रस्ताव तयार केला होता. त्या प्रस्तावानुसार संबंधित जमिनींचे अधिग्रहणही करण्यात आले होते. मात्र अलीकडे या प्रकल्पात बदल करून अकोले तालुक्याला वगळून नारायणगाव—संगमनेर—नाशिक असा नवा मार्ग प्रस्तावित करण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे. या बदलामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. प्रकल्पाच्या मार्गात बदल करताना लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेण्यात आल्याकडे मंत्री विखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. सध्याच्या परिस्थितीत प्रकल्प अहवालातील बदलांमुळे लोकप्रतिनिधी व जनतेमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. तसेच प्रशासकीय पातळीवर प्रकल्पासंदर्भात कोणती कार्यवाही सुरू आहे, याची स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, पुण्याहून नाशिककडे जाणाऱ्या रेल्वे मार्गात नारायणगाव येथील जेएमआरटी (रेडिओ टेलिस्कोप सेंटर) अडथळा ठरत असल्याचे कारण केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी लोकसभेत दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता, प्रकल्पाबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींची संयुक्त बैठक बोलावावी आणि



मार्गाबाबतच्या भावना समजून घ्याव्यात, अशी सूचनाही मंत्री विखे पाटील यांनी केली आहे.

२०१९ मध्ये तयार करण्यात आलेल्या मूळ प्रकल्प अहवालाची अंमलबजावणी व्हावी, यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी व जनतेच्या भावना केंद्रीय रेल्वेमंत्र्यांपर्यंत पोहोचवाव्यात, अशी विनंती मंत्री विखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चेदरम्यान केली.


## हेल्थ...

### महाराष्ट्राची क्रश प्राजक्ता माळीने अखेर सांगितलं फिटनेसचं ते खास सीक्रेट



सेलिब्रिटींच्या झगमगाटी आयुष्यामागे प्रचंड मेहनत आणि कडक शिस्त असते, हे प्राजक्ता माळीच्या दिनचर्येवरून स्पष्ट होते. आजच्या 'फास्ट फूड' आणि रात्री उशिरापर्यंत जागण्याच्या युगात प्राजक्ताने निसर्गनियमांचे पालन करण्यावर भर दिला आहे. तिच्या मते, आपण जे खातो आणि ज्या प्रकारे आपली दिनचर्या आखतो, त्याचा थेट परिणाम आपल्या चेहऱ्यावर आणि ऊर्जेवर होतो. प्राजक्ताने केवळ आहारावरच नाही, तर मानसिक शांतीसाठी ध्यान आणि पुरेशा विश्रांतीचे महत्त्वही अधोरेखित केले आहे.

### तासांची झोप आणि पहाटेचे महत्त्व




प्राजक्ताच्या मते, ८ तासांची शांत झोप ही आरोग्यासाठी सर्वात महत्त्वाची गुंतवणूक आहे. रात्री २-३ वाजेपर्यंत जागून चेहऱ्यावर तजेलदारपणा मिळवणे अशक्य आहे. शक्य तितक्या लवकर झोपून पहाटे लवकर उठल्यामुळे शरीराला नैसर्गिकरीत्या पुनरुज्जीवन मिळते, ज्यामुळे दिवसभर उत्साह टिकून राहतो. केवळ शारीरिक व्यायाम पुरेसा नसून मानसिक आरोग्यही तितकेच महत्त्वाचे आहे. प्राजक्ता दररोज २० मिनिटे मेडिटेशन करण्याचा सल्ला देते. ध्यानामुळे मनातील तणाव कमी होतो, एकाग्रता वाढते आणि चेहऱ्यावर एक नैसर्गिक शांती व तेज येते, जे महागड्या सौंदर्य प्रसाधनांनी मिळवता येत नाही.

### वयाच्या 30 नंतर पोट का सुटतं ...



आजच्या धकाधकीच्या जीवनात आणि चुकीच्या जीवनशैलीमुळे पोटावरील चरबी वाढणे ही एक जागतिक समस्या बनली आहे. विशेषतः वयाची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर पोटावर चरबी साचण्याचे प्रमाण वेगाने वाढते. अनेकांना असा अनुभव येतो की, विशीमध्ये जो आहार घेतल्यावर काहीच फरक पडत नव्हता, तोच आहार आता वजन वाढवण्यासाठी कारणीभूत ठरत आहे. डॉ. सौरभ सेठी यांच्या मते, हा बदल अचानक होत नसून आपल्या शरीरात होणाऱ्या नैसर्गिक प्रक्रियेचा तो एक भाग आहे. वाढत्या वयानुसार शरीराची चयापचय क्रिया मंदावते आणि शरीराची रचना बदलू लागते.पूर्वीसारखाच व्यायाम करूनही वजन कमी होत नाही, कारण शरीरातील अंतर्गत यंत्रणा आता वेगळ्या पद्धतीने कार्य करत असते. तिशीनंतर होणारे स्नायूंचे नुकसान, हार्मोन्समधील बदल आणि इन्सुलिनच्या कार्यक्षमतेत होणारी घट ही बेली फॅट वाढण्यामागची प्रमुख कारणे आहेत. ही परिस्थिती हाताळण्यासाठी केवळ डाएट करून चालत नाही, तर आपल्याला आपल्या जीवनशैलीत जाणीवपूर्वक आणि शास्त्रीय बदल करणे आवश्यक असते. वेळीच लक्ष दिल्यास वाढत्या वयातील ही चरबी रोखणे आणि शरीर सुडौल राखणे शक्य आहे. वयाच्या तिशीनंतर दर दहा वर्षांनी शरीरातील स्नायूंचे प्रमाण ३ ते ८ टक्क्यांनी कमी होऊ लागते. स्नायू हे शरीरातील असे ऊतक आहेत जे आपण विश्रांती घेत असतानाही कॅलरी बर्न करण्याचे काम करतात. जेव्हा स्नायू कमी होतात, तेव्हा शरीराची ऊर्जा खर्च करण्याची क्षमता कमी होते. स्नायू हे रक्तातील ७० ते ८० टक्के ग्लुकोजचा वापर करतात; मात्र स्नायूंचे मांस कमी झाल्यामुळे ही साखर रक्तातच राहते आणि शेवटी पोटावर चरबीच्या रूपात जमा होते.


### रात्री जेवणानंतर फक्त 5 मिनिटे करा ही सोपी गोष्ट, अपचन व बद्धकोष्ठता होईल छुमंतर...



सध्याच्या धावपळीच्या युगात वेळेअभावी आपल्या खाण्यापिण्याच्या सवयी पूर्णपणे विस्कळीत झाल्या आहेत. दिवसभर कामाचा ताण, मोबाईलचा अतिवापर आणि स्क्रीन समोर घालवलेला वेळ यामुळे आपण अनेकदा रात्री उशिरा आणि घाईघाईत जेवण करतो. रात्रीच्या वेळी मसालेदार किंवा जड अन्नाचे सेवन केल्याने त्याचा थेट परिणाम आपल्या पचनसंस्थेवर होतो. रात्री आपली पचनक्रिया नैसर्गिकरित्या मंदावलेली असते, अशात जेवल्याबरोबर लगेच झोपल्यामुळे अन्नाचे पचन नीट होत नाही. यामुळे पोट जड वाटणे, गॅस, आम्लपित्त, अपचन आणि बद्धकोष्ठतेसारख्या तक्रारी उद्भवतात.या समस्यांमुळे केवळ अस्वस्थता जाणवत नाही, तर रात्रीची शांत झोपही मोडते. पोटाच्या या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे रूपांतर गंभीर आजारांमध्ये होऊ शकते. मात्र, या सर्व समस्यांवर योगासनांमधील 'वज्रासन' हा एक रामबाण उपाय ठरतो. पोषणतज्ज्ञ लिना महाजन यांच्या मते, जेवणानंतर दररोज केवळ पाच मिनिटे वज्रासनात बसल्यास पचनक्रिया गतिमान होते आणि शरीर हलके वाटते. ही साधी सवय आपल्या पोटाचे आरोग्य सुधारून आपल्याला शांत झोप मिळवून देण्यास मदत करते.

# बॉलिवूडच्या इतिहासातील चौथी सर्वात मोठी फिल्म ठरली धुरंधर

## वर्ल्डवाइड कलेक्शन 1029 कोटी झाले, लवकरच शाहरुखच्या पठाणचा रेकॉर्ड मोडू शकते



रणवीर सिंगचा 'धुरंधर' चित्रपट बॉक्स ऑफिस कलेक्शनमध्ये सातत्याने मोठे विक्रम प्रस्थापित करत आहे. चित्रपटाने चौथ्या शनिवारी, म्हणजेच 27 डिसेंबर रोजी, 20.90 कोटी रुपयांचे शानदार कलेक्शन करत रणबीर कपूरच्या 'ॲनिमल' चित्रपटालाही मागे टाकले आहे. चित्रपटाचे जगभरातील कलेक्शन 1026 कोटी रुपये झाले आहे. यासोबतच हा चित्रपट बॉलिवूडच्या इतिहासातील चौथा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट बनला आहे.

बॉलिवूडमधील सर्वाधिक कमाई करणारे चित्रपट

दंगल- 2040 कोटी
जवान- 1148 कोटी
पठाण- 1050 कोटी
धुरंधर- 1026 कोटी (23 दिवसांत)
ॲनिमल- 917 कोटी

चित्रपट धुरंधरचे दिग्दर्शन आदित्य धर यांनी केले आहे.

चित्रपट धुरंधरचे दिग्दर्शन आदित्य धर यांनी केले आहे.

शाहरुख खानच्या पठाणचा विक्रम लवकरच मोडू शकतो

धुरंधर चित्रपटाच्या सध्याच्या कमाईचा विचार करता, असा अंदाज आहे की हा चित्रपट चौथ्या रविवारी बंपर कमाई करून शाहरुख खानच्या पठाणचा विक्रम मोडेल. हा चित्रपट 5 डिसेंबर रोजी प्रदर्शित झाला होता. चौथ्या आठवड्यातही हा चित्रपट दररोज सुमारे 20 कोटी रुपयांचे कलेक्शन करत आहे. चौथ्या शुक्रवारी चित्रपटाने 15 कोटी कमावले होते, मात्र शनिवारी कलेक्शन पुन्हा वाढून 20.90 कोटी झाले. अशा परिस्थितीत, रविवारी हा चित्रपट निश्चितपणे 20 कोटींहून अधिक कलेक्शन करू शकतो.

सर्व भाषांमध्ये भारतातील 9वा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे धुरंधर

हिंदी चित्रपटांच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांमध्ये धुरंधर चौथ्या क्रमांकावर आहे, मात्र सर्व भाषांमधील (हिंदी, तमिळ, तेलुगू, मल्याळम, कन्नड) सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांमध्ये धुरंधर अजूनही 9व्या क्रमांकावर आहे.

सर्वाधिक कमाई करणारे भारतीय चित्रपट

दंगल (हिंदी)- 2048 कोटी
बाहुबली 2 (तेलुगु)- 1810 कोटी
पुष्पा 2: द रूल (तेलुगु)- 1642 कोटी
RRR (तेलुगु)- 1300 कोटी
KGF 2 (कन्नड)- 1200 कोटी
जवान (हिंदी) - 1148 कोटी
पठान (हिंदी)- 1050 कोटी
कल्कि 2898AD (तेलुगु)- 1042 कोटी
धुरंधर (हिंदी)- 1026 कोटी (23 दिवसांत)

धुरंधरसमोर कार्तिक-अनन्याचा चित्रपट फिका पडला

5 डिसेंबर रोजी प्रदर्शित झालेल्या धुरंधर चित्रपटाला 20 दिवस पूर्ण झाल्यानंतर, 25 डिसेंबर रोजी कार्तिक आर्यन आणि अनन्या पांडे यांचा 'तू मेरी मैं तेरा, मैं तेरा तू मेरी' हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाने पहिल्याच दिवशी 7.75 कोटी रुपयांचे कलेक्शन केले, तर याच्या तुलनेत धुरंधरने 20 व्या दिवशी 18 कोटी रुपये कमावले. दुसऱ्या दिवशी कार्तिकच्या चित्रपटाने केवळ 5.25 कोटी रुपये कमावले, तर याच दिवशी धुरंधरचे कलेक्शन 25 कोटी रुपये झाले. तिसऱ्या दिवशी सुमारे 5 कोटी रुपयांचे कलेक्शन करून, या चित्रपटाने तीन दिवसांत केवळ 18.25 कोटी रुपयांचे कलेक्शन केले आहे.

मार्च 2026 मध्ये येणार धुरंधर 2

२०२५ सालचा सर्वात मोठा चित्रपट ठरल्यानंतर, आता धुरंधरचा दुसरा भाग १९ मार्च २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. याचा बॉक्स ऑफिसवर संघर्ष यश आणि कियारा अडवाणी अभिनीत 'टॉक्सिक' चित्रपटाशी होईल.

# विक्रम भट्ट-पत्नीची दुसरी जामीन याचिका फेटाळली

### इंदिरा आयव्हीएफच्या संस्थापकाने 30 कोटींच्या फसवणुकीचे आरोप केले

लोकप्रिय चित्रपट निर्माता विक्रम भट्ट आणि त्यांची पत्नी श्वेतांबरी यांना फसवणुकीच्या प्रकरणात 7 डिसेंबर रोजी अटक करण्यात आली होती. एकदा जामीन अर्ज फेटाळल्यानंतर, या जोडप्याने दुसऱ्यांदा जामिनासाठी अर्ज केला होता, तथापि, त्यांचा अर्ज फेटाळण्यात आला आहे.

विक्रम भट्ट आणि त्यांच्या पत्नीवर इंदिरा IVF च्या संस्थापकाने 30 कोटी रुपयांच्या फसवणुकीचा आरोप केला होता, त्यानंतर या जोडप्याला अटक करून 14 दिवसांच्या रिमांडवर पाठवण्यात आले होते. 24 डिसेंबर रोजी रिमांड पूर्ण झाल्यानंतर, या जोडप्याने जामीन अर्ज केला होता, परंतु संवेदनशील टप्प्याचा हवाला देत तो फेटाळण्यात आला आणि त्यांची रिमांड वाढवण्यात आली आहे. न्यायालयाचे म्हणणे आहे की या प्रकरणात अटक आणि चौकशी आवश्यक आहे.

राजस्थानमधील इंदिरा ग्रुप ऑफ कंपनीजचे मालक डॉ. अजय मुर्डिया यांनी 17 नोव्हेंबर रोजी विक्रम भट्ट यांच्यासह 8 लोकांविरुद्ध 30 कोटी रुपयांच्या फसवणुकीची एफआयआर उदयपूरमध्ये दाखल केली होती.

डॉ. अजय मुर्डिया यांचा आरोप आहे की, एका कार्यक्रमात त्यांची भेट दिनेश कटारिया यांच्याशी झाली होती. दिनेश कटारिया यांनी त्यांना पत्नीचे बायोपिक बनवण्याचा प्रस्ताव दिला.

या संदर्भात दिनेश कटारिया यांनी २४ एप्रिल २०२४ रोजी मुंबईतील वृंदावन स्टुडिओमध्ये बोलावले होते. कटारिया यांनी त्यांची विक्रम भट्ट यांच्याशी भेट घालून दिली, जिथे भट्ट यांच्यासोबत बायोपिक बनवण्यावर चर्चा झाली होती.

काही दिवसांनंतर विक्रम आणि श्वेतांबरी भट्ट यांनी डॉ. अजय मुर्डिया यांना सांगितले की, ७ कोटी रुपये आणि आर्थिक मदत घेऊन ते ४ चित्रपट ४७ कोटी रुपयांमध्ये बनवू शकतात. या चित्रपटांच्या प्रदर्शनातून १०० ते २०० कोटी रुपयांपर्यंत नफा होईल.

त्यानंतर त्यांच्या कर्मचाऱ्यांमध्ये अमनदीप मनजीत सिंग, मुदित, फरजाना आमिर अली, अबजानी, राहुल कुमार, सचिन गरगोटे, सबोबा भिमाना अडकरी यांच्या नावाच्या खात्यात ७७ लाख ८६ हजार ९७९ रुपये हस्तांतरित केले.

अशा प्रकारे २ कोटी ४५ लाख ६१ हजार ४०० रुपये हस्तांतरित करण्यात आले. तर इंदिरा एंटरटेनमेंटकडून ४२ कोटी ७० लाख ८२ हजार २३२ रुपयांचे पेमेंट करण्यात आले, तर चार चित्रपटांचे निर्माण ४७ कोटी रुपयांमध्ये करण्याचे ठरले होते.

दोन चित्रपट प्रदर्शित झाले, एकावर काम सुरूही झाले नाही

विक्रम भट्ट आणि श्वेतांबरी भट्ट यांनी फक्त दोन चित्रपटांची निर्मिती करून ते प्रदर्शित केले. तिसरा चित्रपट विश्व विराट जवळपास 25 टक्केच बनवला गेला. चौथ्या चित्रपट महाराणा-रणचे अद्याप चित्रीकरणही सुरू झाले नाही. आरोप आहे की दिग्दर्शकाने महाराणा-रण चित्रपटाचेच 25 कोटी रुपये हडपले.

इंदिरा IVF चे मालक डॉ. अजय मुर्डिया (पीडित) यांनी चित्रपट दिग्दर्शक, त्यांची पत्नी, मुलगी कृष्णा (अंधेरी वेस्ट, मुंबई येथील रहिवासी), दिनेश कटारिया (सहेली नगर, उदयपूर येथील रहिवासी), महबूब अन्सारी (निर्माता, ठाणे येथील रहिवासी), मुदित बुटट्टान (दिल्ली येथील रहिवासी), गंगेश्वरलाल श्रीवास्तव (डीएससी अध्यक्ष), अशोक दुबे (महासचिव), फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज, मुंबई यांच्या विरोधात भूपालपुरा (उदयपूर) पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.



# अभिनेत्रीच्या बांगलादेशी हिंदूंना पाठिंब्याच्या पोस्टवर केली टीका ; कोणालाही घाबरत नाही

बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर ही पहिली अभिनेत्री आहे, जिने बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या क्रूरतेविरोधात आवाज उठवला आणि सोशल मीडियावर उघडपणे त्याचा तीव्र निषेध केला. त्यानंतर बरोबर अर्ध्या तासाने, प्रसिद्ध यूट्यूबर ध्रुव राठीने जान्हवी कपूरशी संबंधित एक व्हिडिओ शेअर केला. ध्रुव व्हिडिओमध्ये बॉलिवूड सेलिब्रिटींच्या प्लास्टिक सर्जरीबद्दल बोलला होता, मात्र त्याच्यावर आरोप झाले की त्याने जान्हवी कपूरच्या बांगलादेशाशी संबंधित पोस्टवर टीका केली होती. आता वाद निर्माण झाल्यानंतर ध्रुव राठीने या प्रकरणावर स्पष्टीकरण दिले आहे.




ध्रुव राठीने आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. यात तो एका सोशल मीडिया वापरकर्त्याची कमेंट वाचतो, ज्यात लिहिले होते, 'जागो हिंदू, जान्हवी कपूरने बांगलादेशी हिंदूंसाठी पोस्ट केली आणि ध्रुव राठीने तिच्या सौंदर्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत व्हिडिओ पोस्ट केला आहे.' हे वाचताना ध्रुव राठी म्हणाला, 'देवाने मेंदू दिला आहे, का वापरत नाही. भाजप आयटी सेलवाले जे पोस्ट टाकत राहतील, त्यावर तुम्ही आंधळेपणाने विश्वास ठेवत राहाल. पहिली गोष्ट म्हणजे, ज्या दिवशी जान्हवी कपूरने पोस्ट टाकली, त्याच दिवशी अर्ध्या तासात मी व्हिडिओ टाकला. हे तार्किकदृष्ट्या शक्य आहे का की मी एकाच दिवसात अर्ध्या तासाचा व्हिडिओ संशोधन करून, शूट करून, एडिट करून टाकेन. दुसरं म्हणजे, मी स्वतः बांगलादेशी हिंदूंवर रील बनवली, तर मी त्या गोष्टीवरून (जान्हवी कपूरला) का टीका करेन?'

पुढे ध्रुव राठी म्हणाला, 'बघा, मी तुमच्यासारखा नाही, की इकडे-तिकडे फिरून अप्रत्यक्षपणे कोणावर टीका करत नाही. मला जे बोलायचं असतं ते मी तोंडावर बोलतो. मी तुमच्या पापाला (जसे ध्रुव नरेंद्र मोदींसाठी म्हणतात) घाबरत नाही, ना मी कोणत्याही बॉलिवूड सेलिब्रिटीला घाबरतो. जे बोलायचं असतं ते मी उघडपणे थेट त्यांच्या तोंडावर बोलतो. तिसरी सर्वात मनोरंजक गोष्ट म्हणजे माझा संपूर्ण व्हिडिओ प्लास्टिक सर्जरीवर आहे की त्याचा समाजात काय परिणाम होतो. संपूर्ण व्हिडिओमध्ये मी जान्हवी कपूरला कोणताही प्रश्न विचारला नाही. या व्हिडिओमध्ये प्रश्न कुठे आहे? एखाद्या तिसऱ्या व्यक्तीने काय लिहिले आहे, त्यावर विश्वास ठेवण्यापूर्वी एकदा स्वतः पडताळून पाहा.'

जान्हवी कपूरला यूट्यूब व्हिडिओच्या थंबनेलमध्ये टाकण्याचे कारण सांगताना ध्रुव राठी म्हणाला आहे, 'जान्हवीला थंबनेलमध्ये टाकले कारण आजच्या ज्या अभिनेत्रींनी प्लास्टिक सर्जरी केल्याचे कबूल केले आहे, त्यापैकी जान्हवी कपूर सर्वात प्रसिद्ध आहे.'

वाद झाल्यानंतर ध्रुव राठीच्या यूट्यूब व्हिडिओचे थंबनेल बदलले होते. अनेकांनी सोशल मीडियावर लिहिले की, वाद झाल्यानंतर त्यांनी हा बदल केला आहे. यावर ध्रुवने स्पष्ट केले आहे की, प्रत्येक व्हिडिओला अनेक थंबनेल असतात, जे आपोआप बदलत राहतात. त्याने हे स्वतः केलेले नाही.

जान्हवी कपूरची पोस्ट काय होती?

बांगलादेशात 18 डिसेंबरच्या रात्री हिंदू युवक दीपू चंद्र दासची निर्घृण हत्या करण्यात आली. यावर संताप व्यक्त करत जान्हवी कपूरने सोशल मीडियावर लिहिले,

# नवीन वर्षाच्या सुट्टीसाठी निघाले रणबीर-आलिया

## विमानतळावर क्लीन-शेव्ह अवतारात दिसला अभिनेता



रणबीर कपूर आणि आलिया भट्ट नवीन वर्षाच्या काही दिवसांपूर्वी मुंबई विमानतळावर दिसले. दोघे सुट्ट्या घालवण्यासाठी निघाले होते. यावेळी रणबीर कपूरचा नवीन लूक सर्वाधिक चर्चेत राहिला. व्हिडिओमध्ये रणबीर क्लीन-शेव्ह लूकमध्ये दिसला. त्याने बाहेर उभ्या असलेल्या फोटोग्राफर्सना थम्स-अप देखील दिला.

आलिया भट्टनेही पापाराझींचे उत्साहाने स्वागत केले. ती हसताना दिसली, हात हलवला आणि विमानतळाच्या आत जाण्यापूर्वी फ्लाइंग किस देखील दिला.

रणबीर ब्लॅक आउटफिटमध्ये दिसले.

रणबीर ब्लॅक आउटफिटमध्ये दिसले.

आलियाने ऑलिव्ह ग्रीन ओव्हरसाईज्ड जॅकेट, सनग्लासेससह कॅज्युअल ट्रॅव्हल लूक निवडला.आलियाने ऑलिव्ह ग्रीन ओव्हरसाईज्ड जॅकेट, सनग्लासेससह कॅज्युअल ट्रॅव्हल लूक निवडला.

गेल्या वर्षी रणबीर आणि आलियाने नवीन वर्ष थायलंडमध्ये साजरे केले होते. त्यावेळी त्यांच्यासोबत मुलगी राहा आणि कपूर कुटुंबातील इतर सदस्यही होते.

या आठवड्याच्या सुरुवातीला आलियाने तिच्या ख्रिसमस सेलिब्रेशनचे फोटोही शेअर केले होते. तिने मुंबईत तिच्या आई सोनी राजदान यांच्या घरी झालेल्या ख्रिसमस पार्टीचे फोटो इंस्टाग्रामवर पोस्ट केले. या फोटोंमध्ये कुटुंबाचे आनंदाचे क्षण दिसले. यात रणबीर, आलिया आणि त्यांची मुलगी राहा यांची सुंदर झलकही होती.

वर्क-फ्रंटबद्दल बोलायचं झाल्यास, आलिया भट्ट लवकरच 'अल्फा' चित्रपटात दिसणार आहे. ट्रेड ॲनालिस्ट तरण आदर्श यांच्या मते, चित्रपटाची रिलीज पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सलमान खानच्या आगामी वॉर चित्रपट 'बॅटल ऑफ गलवान' सोबत होणारा संघर्ष टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

शिव रावैल दिग्दर्शित 'अल्फा' हा वायआरएफ स्पाय युनिव्हर्सचा सहावा चित्रपट आहे. या फ्रँचायझीमध्ये 'एक था टायगर', 'टायगर जिंदा है', 'वॉर' आणि 'पठाण' यांसारख्या चित्रपटांचा समावेश आहे. 'अल्फा'मध्ये आलिया भट्टसोबत शरवरी आणि बॉबी देओल देखील महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.

## अर्थविश्व...

### 2024 मध्ये लिस्टिंग अन् 7700 % रिटर्न, कधी होती 2 रुपये शेअरची किंमत, गुंतवणूकदारांचं स्टॉकवर लक्ष



या कंपनीने पुन्हा एकदा गुंतवणूकदारांचे लक्ष वेधून घेतले आहे. ऑगस्ट 2024 मध्ये शेअर बाजारात लिस्टिंग झाल्यापासून या कंपनीने तब्बल 7,700% पेक्षा जास्त परतावा दिला आहे. आता कंपनीने आपल्या विस्ताराच्या योजनांना अधिक गती देण्यासाठी कर्जाची मर्यादा 500 कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातून मिळालेला 97.35 दशलक्ष डॉलर्सचा मोठा निर्यात ऑर्डर आणि कंपनीची आक्रमक गुंतवणूक धोरणे यामुळे ही कंपनी बाजारात 'हॉट स्टॉक' बनली आहे. सोमवार, 29 डिसेंबर रोजी भागधारकांची मंजुरी आणि नवीन आर्थिक घोषणांच्या पार्श्वभूमीवर या शेअरच्या हालचालींवर प्रत्येक गुंतवणूकदाराची बारीक नजर असणार आहे.

कंपनीचा प्लान

BSE कडे केलेल्या फाइलिंगनुसार, एलीटकॉनने आपली कर्ज घेण्याची क्षमता 500 कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनी कायदा 2013 च्या कलम 180 (1)(C) आणि 186 नुसार हा विस्तार केला जात आहे. यामुळे कंपनीला अधिक गुंतवणूक करणे, कर्ज देणे आणि हमी (गॅरंटी) प्रदान करणे सोपे होईल. मात्र, यासाठी भागधारकांची मंजुरी मिळणे अजून बाकी आहे. यासाठी ई-वोटिंगची प्रक्रिया 29 डिसेंबरपासून सुरू होणार आहे.

एलीटकॉन इंटरनॅशनलने आपल्या गुंतवणूकदारांना अक्षरशः मालामाल केले आहे. ऑगस्ट 2024 मध्ये शेअर बाजारात लिस्टिंग झाल्यापासून या शेअरने 7,700% पेक्षा जास्त अविश्वसनीय परतावा दिला आहे. गेल्या एका वर्षात या शेअरने 971% वाढ दर्शवली आहे, तर 2025 मध्ये आतापर्यंत (YTD) सुमारे 910% ची वाढ झाली आहे. जो शेअर डिसेंबर 2024 मध्ये फक्त 9.58 रुपयांच्या नीचांकी पातळीवर होता, तो ऑगस्ट2025 मध्ये 422.65 च्या उच्चांकावर पोहोचला आहे.

कंपनीच्या व्यवसायातील ही तेजी केवळ निधी उभारण्यापुरती मर्यादित नाही. 15 डिसेंबर 2025 रोजी या कंपनीला उत्पादनांच्या पुरवठ्यासाठी 97.35 दशलक्ष डॉलर्स (सुमारे 800 कोटी रुपयांपेक्षा जास्त) चा एक मोठा दीर्घकालीन निर्यात करार मिळाला आहे. या ऑर्डरमुळे कंपनीची आंतरराष्ट्रीय बाजारात पकड मजबूत होईल आणि भविष्यातील कमाईची स्पष्टता मिळेल. शुक्रवारी कंपनीचा शेअर 3.23 % घसरून 104.70 रुपयांवर बंद झाला होता. गेल्या पाच सत्रांमध्ये शेअरमध्ये थोडी घट दिसून आली असली तरी, कंपनीचे मार्केट कॅपिटलायझेशन (बाजार भांडवल) 16,736.30 कोटी रुपये इतके आहे.

### पगार होताच संपतोय, रोजच्या खर्चासाठी Credit Card चा वापर करताय ...



तुमची पगार आल्यावर काही दिवसातच संपतो का? दर महिन्याला EMI गेल्यानंतर रोजच्या खर्चासाठी क्रेडिट कार्ड चा आधार घ्यावा लागतो का? जर याचे उत्तर हो असेल, तर तुम्ही कर्ज ाच्या जाळ्यात अडकल्याचे लक्षण असू शकते. अनेकदा लोकांना अचानक जाणवत नाही की ते कर्जात बुडाले आहेत; ही परिस्थिती हळूहळू निर्माण होते. सुरुवातीला एक ईएमआय, मग दुसरे कर्ज, आणि मग क्रेडिट कार्डचा आधार घेतला जातो. सुरुवातीला सर्व काही नियंत्रणात असल्याचे वाटते, पण कालांतराने कर्ज एक ओझे बनते. क्रेडिट ब्युरो क्रिफ हायमार्क (CRIF Highmark) च्या आकडेवारीनुसार, मार्च 2025 पर्यंत 90 दिवसांपेक्षा जास्त थकबाकी असलेले क्रेडिट कार्ड डिफॉल्ट 15 टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. जर तुम्हीही कर्जाच्या जाळ्यात अडकत असाल, तर काही महत्त्वाच्या संकेतांकडे लक्ष द्या. जे मोठ्या संकेताकडे इशारा देतात. यातून बाहेर निघण्याचेही मार्ग आहेत

पहिला अलार्म

क्रेडिट कार्डचे बिल आल्यावर जर तुम्ही दर महिन्याला फक्त मिनिमम अमाऊंट ड्यू भरत असाल, तर पेनल्टी लागत नाही, पण मूळ रक्कम फारशी कमी होत नाही. व्याज वाढत जाते आणि कर्ज अनेक वर्षे पाठ सोडत नाही. उदाहरणार्थ, 1 लाख रुपयांच्या क्रेडिट कार्ड बिलावर फक्त मिनिमम पेमेंट केल्यास व्याजाची रक्कम मूळ खर्चापेक्षा अनेक पटीने जास्त होऊ शकते. शक्य असल्यास, मिनिमम पेक्षा जास्त रक्कम भरा. थोडीशी अतिरिक्त रक्कमही कर्ज लवकर कमी करण्यास मदत करते.जसे की क्रेडिट कार्डचे बिल फेडण्यासाठी पर्सनल लोन घेणे किंवा एक ईएमआय भरण्यासाठी दुसरीकडून उधार घेणे, ही कर्जाच्या जाळ्यात अडकण्याची सामान्य सुरुवात आहे. असे केल्याने कर्ज कमी होत नाही, उलट ते अनेक भागात विभागले जाते आणि व्याजाचा बोजा आणखी वाढतो. त्यामुळे नवीन कर्ज घेण्यापूर्वी थांबा. गरज भासल्यास क्रेडिट काऊन्सेलर किंवा बँकेशी रीपेमेंट प्लॅनवर चर्चा करा.

### पाण्यापेक्षा ही स्वस्त आहे दारू; फक्त 18 रुपयांमध्ये मिळणार बिअरचा एक ग्लास



मुंबई: जगात दारूप्रेमींची कमतरता नाही. अनेक देशांमध्ये दारू खूप महाग आहे, तर काही देश असे आहेत जिथे दारूची किंमत परवडणारी आहे. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी आणि विक्री वाढवण्यासाठी हे केले जाते. आज, आम्ही तुम्हाला अशा देशाबद्दल सांगणार आहोत जिथे पाण्याची बाटली महाग आहे, परंतु बिअरचा ग्लास स्वस्त आहे. येथे दारू पाण्यापेक्षा स्वस्त आहे.जगातील सर्वात स्वस्त बिअरच्या यादीत व्हिएतनाम अव्वल आहे. येथील स्थानिक बिअरला बिया होई म्हणतात आणि त्याची किंमत इतकी कमी आहे की तुम्हाला विश्वास बसणार नाही. बिया होईचा एक ग्लास तुम्हाला 5,000 व्हिएतनामी डोंग किंवा सुमारे 18 रुपये मिळतील, जरी काही ठिकाणी ते 20 ते 25 रुपयांपर्यंत कमी असू शकते. पाण्याच्या बाटलीची किंमत सुमारे 30,000 डोंग किंवा सुमारे 100 रुपये असते.

# स्मृती मानधनाने वर्ल्ड रेकॉर्डसह रचला इतिहास, जगभरात आतापर्यंत कोणालाही ही गोष्ट जमली नाही



तिनुअनंतरपुरम : स्मृती मानधनाने पुन्हा एकदा मैदान गाजवल्याचे पाहायला मिळाले. कारण स्मृतीने श्रीलंकेविरुद्धच्या चौथ्या टी २० सामन्यात एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केल्याचे पाहायला मिळाले.

स्मृती मानधनाने वनडे वर्ल्ड कप चांगलाच गाजवला होता. भारताकडून सर्वाधिक धावा या स्मृतीच्या नावावर होत्या, त्याचबरोबर ती या विश्वविजेत्या संघाची उप कर्णधारही होती. वनडे वर्ल्ड कप तिने चांगलाच गाजवला होता. त्यानंतर आता ती या मालिकेत फलंदाजीला उतरली. पण गेल्या काही सामन्यांत तिला लय सापडली नव्हती, पण या सामन्यात मात्र तिला चांगलात सूर गवसला होता आणि त्यामुळेच तिने एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

स्मृती मानधना या सामन्यात फलंदाजीला आली आणि सुरुवातीपासून तिने धडाकेबाज फटकेबाजी करायला सुरुवात केली. स्मृतीने एकामागून एक चौकार लगावले. स्मृतीने १४ चेंडूंत पाच चौकार लगावत आक्रमकपणे फलंदाजी केली होती. त्यामुळे स्मृती या सामन्यात मोठी खेळी साकारणार, असे दिसत होते. स्मृतीने चौथ्या षटकात दोन सलग चौकार लगावले होते आणि तिला पाचव्या सामन्यात हा महारेकॉर्ड रचण्याची संधी होती.

स्मृतीने आतार्यंत वनडे आणि टी २० क्रिकेटमध्ये दमदार फलंदाजी केली आहे. स्मृतीने या सामन्यात १० हजार धावा पूर्ण करण्याचा मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. यापूर्वी भारताकडून मिताली राजने ३१४ सामन्यांत १० हजार धावांचा पल्ला ओलांडला होता. पण स्मृतीने मात्र २८० सामन्यांतच ह मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. जगभरात कोणालाही एवढ्या कमी सामन्यांत १० हजार धावा करता आल्या नाही आणि त्यामुळे भारताकडून सर्वात जलद १० हजार धावा पूर्ण करण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड आता स्मृती मानधनाच्या नावावर असणार आहे. त्यामुळे स्मृती मानधनाने भारतीय क्रिकेटमध्ये एक नवा अध्याय लिहिला आहे. त्यामुळे आता भारताकडून सर्वात जलद १० हजार पूर्ण करण्याचा महा रेकॉर्ड आता स्मृती मानधनाच्या नावावर असणार आहे. स्मृतीने या सामन्यात २७ धावा पूर्ण केल्या आणि हा महा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

स्मृती मानधनाने या सामन्यात दमदार फलंदाजी केली, त्यामुळे भारताला पहिल्या पॉवर प्लेमध्ये ६१ धावा करता आल्या.

# वैभव सूर्यवंशीसाठी आनंदाची बातमी



नवी दिल्ली : धडाकेबाज फटकेबाजी करणाऱ्या वैभव सूर्यवंशीसाठी आता एक आनंदाची बातमी आली आहे. वर्ल्ड कपच्या संघात तर त्याची निवड झाली आहे. पण जेव्हा दक्षिण आफ्रिकेचा संघ निवडण्यात आला तेव्हा त्याच्यासाठी अजून एक गुड न्यूज आली आहे. कारण चार दिवसांत त्याच्यासाठी चार महत्वाच्या गोष्टी घडल्या आहेत.वैभव सूर्यवंशी सध्या भन्नाट फॉर्मातआहे. काही दिवसांपूर्वीच तो विजय हझारे ट्रॉफी खेळण्यासाठी मैदानात उतरला होता. त्यावेळी वैभवने चक्क १६ चौकार आणि १५ षटकार लगावले होते. वैभवने यावेळी एबी डिव्हिलियर्सचा मोठा विक्रमही मोडला होता. वैभवने या सामन्यात ८४ चेंडूंत १९० धावांची धमाकेदार खेळी साकारली होती. पण त्यानंतर वैभवच्या शिरपेचात अजून मानाचा तुरा रोवला गेला. कारण वैभव सूर्यवंशीला पंतप्रधान बाल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारताच्या राष्ट्रपतींकडून त्याला हा मानाचा पुरस्कार देण्यात आला. त्यानंतर भारताच्या वर्ल्ड कपच्या संघाची निवड झाली, त्यामध्ये वैभव सूर्यवंशीला संधी देण्यात आली आहे. पण त्याचबरोबर जेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यासाठी भारताचा संघ निवडण्यात आला, तेव्हा वैभव सूर्यवंशीला अजून एक गुड न्यूज मिळाल्याचे पाहायला मिळाले आहे. वर्ल्ड कपच्या संघासाठी भारतीय संघाचे कर्णधारपद हे आयुष म्हात्रेकडे सोपवण्यात आलं आहे. काही दिवसांपूर्वी १९ वर्षांखालील आशिया कप झाला होता, तेव्हाही आयुषकडेच भारताचे कर्णधारपद देण्यात आले होते. पण त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यासाठी भारताचा संघ निवडण्यात आला, त्यासाठी आता वैभव सूर्यवंशीकडे कर्णधारपद देण्यात आले आहे. या चारही महत्वाच्या गोष्टी फक्त 4 दिवसांतच घडल्या आहेत. कारण २४ डिसेंबरला त्याने १९० धावा केल्या, २६ डिसेंबरला त्याला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आणि २७ डिसेंबरला त्याची वर्ल्ड कपच्या संघात निवड झाली आणि दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यासाठी कर्णधारपदही देण्यात आले.

# मुंबई इंडियन्सची मॅच पाहायला गेला अन् करोडपती होऊन घरी परतला..



नवी दिल्ली : मुंबई इंडियन्सच्या फॅनला आता एक जबरदस्त लॉटरी लागली असल्याचे समोर आले आहे. कारण मुंबई इंडियन्सचा हा चाहता सामना पाहायला गेला होता. पण सामना सुरु असतानाच या मुंबई इंडियन्सच्या फॅनला चक्क एक कोटी रुपये सर्वांसमोर मिळाले. यावेळी मैदानात नेमकं घडलं तरी काय, याचा व्हिडिओ आता जोरदार व्हायरल होत आहे.

ही गोष्ट घडली ती १३ व्या षटकात. त्यावेळी मुंबई इंडियन्सची फलंदाजी होती. रायन रिक्लेटन हा त्यावेळी भन्नाट फॉर्मात होता. रायनने यावेळी ३४ चेंडूंत ६४ धावा केलेल्या होत्या. या १३ व्या षटकात रायन हा वेगवान गोलंदाज मफाकाचा सामना करत होता. या षटकाच्या चौथ्या चेंडूवर ही गोष्ट घडली. या चौथ्या चेंडूचा सामना करायला रायन सज्ज झाला होता. हा चेंडू रायनच्या अंगाच्या दिशेने आला. हा स्लो बाऊन्सर होता. रायनने हा चेंडू योग्यपणे टिपला. आपल्या छातीच्या दिशेने हा आलेला चेंडू त्याने असा भिरवकावला की थेट तो प्रेक्षकांमध्ये जाईल, याची सर्वांनाच खात्री होती आणि घडलेही तसेच. रायनला यावेळी सहा धावा मिळाल्या. पण त्यापेक्षा एका चाहत्याला हा षटकार करोडपती करून गेला.

रायनने मारलेला चेंडू थेट प्रेक्षकांमध्ये गेला. त्यावेळी एका चाहत्याने हा चेंडू एका हातात टिपला. दक्षिण आफ्रिकेत असा एक नियम आहे की, जो चेंडू षटकार म्हणून थेट प्रेक्षकांमध्ये येईल आणि जो तो एका हातात टिपेल, त्याला २० लाख रँड दिले जातील. या चाहत्याने एका हातात तो चेंडू टिपला आणि त्याला २० लाख रँड म्हणजे भारतीय करन्सीनुसार १ एक कोटी रुपये मिळाले.

मुंबई इंडियन्सचा संघ सध्या दक्षिण आफ्रिकेतील टी २० लीग खेळत आहे. मुंबई इंडियन्सच्या या संघात दक्षिण आफ्रिकेचा सलामीवीर रायल रिक्लेटन आहे, ज्याच्या षटकारावर ही गोष्ट घडली. मुंबई इंडियन्सचा हा सामना सुरु होता आणि क्षणाधार्त मुंबई इंडियन्सच्या चाहत्याला एक कोटी रुपये मिळाले. यावेळी बाकीच्या चाहत्यांनी त्याचे जोरदार स्वागत केले. मुंबई इंडियन्सच्या या लकी फॅनचा व्हिडिओ भन्नाट व्हायरल झाला आहे.

# 'जर देवाने मला वरदान दिले, तर मी कोहलीला...'

## नवज्योत सिंह सिद्धू यांच्या पोस्टची क्रिकेट वर्तुळाच चर्चा, काय म्हणाले....



मुंबई : टीम इंडियाचे स्टार खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी विजय हजारे ट्रॉफी गाजवली. दोघांनीही शतके करत ते इतके मोठे खेळाडू का आहेत हे आपल्या प्रदर्शनामधून दाखवून दिलं. आपल्या फिटनेसवर काम रोहितने आपण वर्ल्ड कपसाठी तयार असल्याचं दाखवून दिलं आहे. तर दुसरीकडे विराट पहिल्यापासून टीममध्ये फिटनेसच्या बाबतीत आघाडीवर राहिला आहे. दोघेही आता फक्त वनडे फॉरमॅट खेळत आहेत. विराटमध्ये आताही कसोटी क्रिकेट खेळण्याची क्षमता आहे. याच पार्श्वभूमीवर माजी क्रिकेटपटून आणि समालोचक नवज्योत सिंह सिद्धूने विराटबाबत केलेले विधान चर्चेत आले आहे.

जर देवाने मला एक वरदान दिले असते, तर मी म्हटले असते की कोहलीला वृत्तीतून परत आणून कसोटी क्रिकेट खेळवावे. या देशासाठी यापेक्षा जास्त आनंदाची आणि उत्साहाची गोष्ट काय असू शकते. त्याचा फिटनेस २० वर्षांच्या मुलासारखा आहे, तो एक २४ कॅरेट सोन्यासारखा असल्याचं नवज्योत सिद्धू याने म्हटलं आहे.

विराट कोहली याने १२ मे २०२५ रोजी कसोटी क्रिकेटमधून अधिकृतपणे निवृत्ती जाहीर केली. या अनपेक्षित निर्णयामुळे चाहते आणि क्रिकेट विश्वात मोठी खळबळ उडाली होती. विराटमध्ये अजूनही देशाला देण्यासाठी कसोटी क्रिकेट शिल्लक होते. मात्र टीम मॅनेजमेंटचा दबाव असल्याची दबक्या आवाजात चर्चा होती. विराट कसोटी टीममध्ये असल्यावर मैदानावरील विरोधी संघावर त्याची दहशत दिसायची. कॅप्टन असताना विराटने परदेशात जात यजमानांना अनेकदा दबावात ठेवले होते. कसोटी क्रिकेटमधील त्याचा जो काही दबदबा होता त्या प्रत्येकाने पाहिला आहे. मात्र आता नवख्या टीममध्ये तो जोर काही दिसत नाही.

आता झालेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत कोहलीने एकूण ३०२ धावा केल्या, ज्यात दोन शतके आणि एक अर्धशतकी खेळी समाविष्ट होती. या कामगिरीसाठी त्यांना प्लेयर ऑफ द सिरीज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विराट कोहलीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये ५३ आणि एकूण ८४ शतके (एक टी२० आंतरराष्ट्रीय शतक धरून) केली आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या कोणत्याही एका फॉरमॅटमध्ये सर्वाधिक शतके करण्याच्या बाबतीत त्यांनी सचिन तेंडुलकरला मागे टाकले आहे. सचिनच्या नावावर एकदिवसीय क्रिकेटमध्ये ४९ शतके आहेत, तर कोहलीच्या नावावर ५३ शतके आहेत.

# टी २० वर्ल्ड कपपूर्वी पाकिस्तानला मोठा धक्का!



नवी दिल्ली : पाकिस्तानला आता टी २० वर्ल्ड कपपूर्वी एक मोठा धक्का बसला आहे. कारण ज्या खेळाडूच्या जीवावर पाकिस्तानचा संघ वर्ल्ड कप जिंकण्याची स्वप्न पाहत होता, त्याच खेळाडूला आता मोठा दुखापत झाली असल्याचे समोर आले आहे. ही दुखापत गंभीर असल्यामुळे आता त्याला वर्ल्ड कपमध्ये खेळता येणार नसल्याचे दिसत असून त्यामुळेच पाकिस्तानचे धाबे दणाणले गेले आहेत.

टी २० वर्ल्ड कप हा भारतात होणार आहे. पण पाकिस्तानचे सर्व सामने हे श्रीलंकेत खेळवले जाणार आहेत, भारत आणि पाकिस्तानचा सामनाही तिथेच होणार आहे. काही दिवसांपूर्वी चॅम्पियन्स ट्रॉफी झाली होती. या चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद हे पाकिस्तानकडे होते, पण पाकिस्तानध्ये खेळण्यास भारताने नकार दिला होता, त्यामुळे भारताचे सर्व सामने दुबईत झाले होते. भारत फायनलमध्ये पोहोचला आणि पाकिस्तानकडून फायनलचे यजमानपदही हिरावून घेतले. त्यामुळे आपल्या देशात फायनल होऊ शकली नाही, याचे दु:ख पाकिस्तानला होते. त्यामुळे आता भारत टी २० वर्ल्ड कपचा यजमान असताना त्यांच्या देशातही फायनल खेळावायला द्यायची नाही आणि त्यासाठी आपण अंतिम फेरीत पोहोचायचे, असे स्वप्न पाकिस्तान पाहत होता. पण पाकिस्तानचे हे स्वप्न आता धुळी मिळताना पाहायला मिळत आहे. कारण आता पाकिस्तानचा सर्वात महत्वाचा खेळाडूच दुखापतग्रस्त झाला आहे आणि या वर्ल्ड कपमध्ये खेळणार की नाही, याबाबत संभ्रम आहे.पाकिस्तानचा सर्वात महत्वाचा खेळाडू आहे तो शाहीन आफ्रिदी. पण आता आफ्रिदीला मोठी दुखापत झाल्याचे पाहायला मिळत आहे. आफ्रिदी हा सध्या ऑस्ट्रेलियात बिग बॅश लीग खेळत आहे. ही लीग खेळत असताना त्यच्या गुडघ्याला दुखापत झाली आणि त्याला सामना अर्धवट सोडून जावे लागले. आफ्रिदीला सामना अर्धवट सोडून डावे लागले म्हणजे त्याची दुखापत गंभीर असल्याचे आता म्हटले जात आहे. जर त्याच्या गुडघ्यावर शस्त्रक्रीया करावी लागली तर त्याला सहा महिने क्रिकेटपासून लांब राहावे लागेल. त्यामुळे आता शाहीन आफ्रिदीबाबत पाकिस्तानची चिंता वाढलेली आहे. पाकिस्तान टी २० वर्ल्ड कप जिंकण्याचे स्वप्न पाहत होती. पण आता त्यांच्या या स्वप्नांचा चुराडा कसा होऊ शकतो, हे आता समोर आले आहे.

## महत्त्वाचे...

### अफगाणिस्तानमधून तस्करी केलेला बेदाणा सांगलीत



नवी दिल्ली : फगाणिस्तानमधून तस्करी केलेला बेदाणा थेट महाराष्ट्राच्या तासगाव आणि सांगली जिल्ह्यात आयात करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. सांगली व तासगाव येथील काही कोल्ड स्टोरेज मालकांनी चीनचा बेदाणा अफगाणिस्तान मार्गे सांगली जिल्ह्यात आयात केल्याचे उघडकीस आले आहे. या कोल्ड स्टोरेज मालकांचा हा भंडाफोड बागायतदार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. तसेच बेदाणा आयात करणाऱ्या व्यापाऱ्यांना बदडून काढू, असा इशारा स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांनी दिला आहे. अफगाणिस्तानमधून तस्करी केलेला बेदाणा थेट सांगली आणि तासगावच्या कोल्ड स्टोरेजवर असल्याची माहिती मिळाल्यानंतर द्राक्ष बागायतदार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी कोल्ड स्टोरेज आणि वॉशिंग सेंटरवर धाडी टाकल्या. अनेक ठिकाणी अफगाणिस्तानचा बेदाणा आढळून आला. तसेच वॉशिंग सेंटर आणि कोल्ड स्टोरेज चालकांनी बेदाणाबाबत अधिक माहिती देण्यास टाळाटाळ केली. दरम्यान, देशांतर्गत बेदाण्याचे दर पाडण्याचे षडयंत्र सुरू असल्याचे बोलले जात आहे.

### नगरपालिका उपाध्यक्ष निवडीचा चेंडू आता फुंडकर यांच्या कोर्टात

नगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी अजून शांत झाली नाही. नवनिर्वाचित नगराध्यक्ष अपर्णा सागर फुंडकर यांनी नगराध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेण्यापूर्वीच उपाध्यक्ष कोण बनणार, स्वीकृत सदस्य पदी कुणाची वर्णी लागणार याची चर्चा शहरात चांगलीच रंगू लागली आहे. निवडूण आलेल्या नगरसेवकांपैकी आपली उपाध्यक्षपदी वर्णी लागावी यासाठी अनेक जण इच्छुक आहेत. स्वीकृत सदस्यपदी अनेकांची नावे चर्चेत आहे. उपाध्यक्ष व स्वीकृत सदस्यांच्या नावाचा चेंडू हा आकाश फुंडकर यांच्या कोर्टात असल्याने ते कोणाच्या नावाला हिरवी झेंडी दाखवतील यावर उपाध्यक्ष व स्वीकृत सदस्याचे भवितव्य अवलंबून आहे. यामुळे अनेक इच्छुक आत्तापासुनच नामदारांची मर्जी सांभाळताना दिसून येत आहे. खामगावकरांनी नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपच्या नगराध्यक्ष व त्यांच्याच पक्षाचे २८ नगरसेवक निवडून दिले आहेत. त्यामुळे आता पुन्हा एकदा या नगरपालिकेवर बहुमताची सत्ता आणून आकाश फुंडकर यांनी शहरातील राजकारणात असलेले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध करून दाखविले आहे. या निवडणुकीत विरोधी सुपडा साफ झाला आहे. विजय नगरसेवकांमध्ये काही दुसऱ्यांदा तर काही चौथ्यांदा निवडून आलेले अनुभवी चेहरे आहेत. त्याच वेळी नवे आणि युवा नगरसेवकांची संख्याही अधिक आहे. त्यामुळे अनुभवाला प्राधान्य की, नव्या दमाला संधी असा प्रश्न भाजप नेतृत्वासमोर उभा टाकला आहे.या संपूर्ण समीकरणात कामगार मंत्री व आमदार ॲड. आकाश फुंडकर यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. खामगाव नगर परिषदेत भाजपची सत्ता आली असलीतरी उपाध्यक्ष विविध विषयांचे सभापती पद वाटप करताना सर्वांना समाधान देणे ही सोपी गोष्ट नाही. एकाच पक्षातील अनेक दावेदार त्यांची गटबाजी वरिष्ठ कनिष्ठ असा समतोल आणि आगामी राजकीय गणिते यामुळे फुंडकर यांची डोकेदुखी वाढणार असल्याची चर्चा भाजपच्या गोटात सुरू आहे.येथील नगरपालिकेच्या सदस्यांची संख्या ३५ आहे दहा नगरसेवकांमध्ये एक स्वीकृत नगरसेवक अशा सूत्रानुसार या नगर पालिकेमध्ये तीन स्वीकृत नगरसेवकाची निवड केली जाणार आहे स्वीकृत सदस्यांसाठी प्रमोद अग्रवाल, अनिस जमादार, राम मिश्रा, राजेंद्र धनोकार, संजय उर्फ मुन्ना पुरवार यांच्या नावाची चर्चा आहे तर उपाध्यक्ष पदासाठी संतोषी चंद्रशेखर पुरोहित, सतीश आप्पा दुडे, महेंद्र रोहनकार, राकेश राणा व प्रवीण कदम यांच्या नावाची चर्चा आहे.

# २ वर्षांत ३ पट वाढली डिजिटल अरेस्ट प्रकरणे

## १ वर्षात २००० कोटींची फसवणूक,...




**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

नवी दिल्ली : देशात डिजिटल अटक घोटाळे आणि संबंधित सायबर गुन्हे 2022 ते 2024 दरम्यान वेगाने वाढले आहेत. राज्यसभेत सरकारने सांगितले की, 2022 मध्ये डिजिटल अटकेची 39,925 प्रकरणे नोंदवली गेली होती आणि फसवणुकीची एकूण रक्कम 91.14 कोटी रुपये होती.

तर, 2024 मध्ये ही प्रकरणे जवळपास तिप्पट वाढून 1,23,672 झाली. फसवणुकीची रक्कम 21 पट वाढून 19,35.51 कोटी रुपयांवर पोहोचली. विशेष म्हणजे, सुशिक्षित लोकही याचे बळी ठरत आहेत.

म्हणून आज डिजिटल अटकेवरील ही संपूर्ण शैक्षणिक कथा नक्की वाचा. सायबर साक्षरता स्तंभात आज आपण जाणून घेऊया की-

भारतात डिजिटल अटकेसारखा कोणताही कायदा आहे का?

सायबर ठग तुमचे मानसिक नियंत्रण त्यांच्या हातात कसे घेतात?

आपण डिजिटल अटकेपासून कसे वाचू शकतो?

तज्ज्ञ: राहुल मिश्रा, सायबर सुरक्षा सल्लागार, उत्तर प्रदेश पोलिस

सर्वात आधी, गेल्या 1-2 महिन्यांत घडलेल्या डिजिटल अटकेच्या काही घटना-

भुवनेश्वरमध्ये एका ज्येष्ठ चार्टर्ड अकाउंटंटला डिजिटल अरेस्ट स्कॅममध्ये अडकवून 1.5 कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली. पीडित सुमारे 10 दिवस त्यांच्या जाळ्यात अडकले होते.

हैदराबादमध्ये 78 वर्षांच्या एका व्यक्तीला डिजिटल अरेस्ट करून त्याच्याकडून 51 लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली.

हैदराबादमध्येच एका 73 वर्षांच्या महिलेला डिजिटल बंधक बनवून तिच्याकडून 1.43 कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली.

स्कॅमर्सनी अलीगढच्या माजी महापौरांच्या पतीला 3 दिवस डिजिटल अरेस्टमध्ये ठेवले. आर्थिक फसवणुकीचे प्रकरण असल्याचे सांगून 50 लाख रुपयांची मागणी केली.

नोएडामधील 83 वर्षांच्या एका ज्येष्ठ महिलेला डिजिटल अरेस्ट करून 31 लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. स्कॅमर्सनी महिलेला 2 दिवस अडकवून ठेवले.

उत्तर प्रदेशातील रामपूर जिल्ह्यात एका दीर-भावजयीला डिजिटल अरेस्ट करून 1.5 लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. स्कॅमर्सनी सांगितले होते की, महिलेच्या पतीवर बलात्काराचा आरोप आहे. त्याला या प्रकरणातून बाहेर काढण्यासाठी पैसे द्या.

मुंबईत टाटा हॉस्पिटलच्या निवृत्त कर्मचाऱ्याला डिजिटल अरेस्ट करून 75.5 लाख रुपयांची फसवणूक केली. त्यांना 3 महिने अडकवून ठेवले.

ज्येष्ठांना बळी बनवत आहेत स्कॅमर्स

या सर्व प्रकरणांमध्ये एक सामान्य गोष्ट अशी आहे की, स्कॅमर्स ज्येष्ठांना डिजिटल अटकेचे बळी बनवत आहेत. त्यांच्या खात्यात जमा असलेल्या मोठ्या रकमेला चुना लावत आहेत.

प्रश्न- डिजिटल अटक काय असते आणि स्कॅमर्स लोकांना कसे फसवतात?

उत्तर- ही स्कॅमर्सनी तयार केलेली सायबर फसवणुकीची एक पद्धत आहे. यात स्कॅमर्स स्वतःला पोलिस, CBI, ED किंवा सायबर एजन्सीचे अधिकारी असल्याचे सांगून व्यक्तीला घाबरवतात. ते प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रकारे आपल्या जाळ्यात ओढतात, जसे की-तुमच्या खात्यातून कोट्यवधी रुपये परदेशी खात्यात हस्तांतरित झाले आहेत. मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हा दाखल होईल.

तुमचं नाव ड्रग्ज प्रकरणात समोर आलं आहे. तुमच्यावर पोलिस केस चालेल.

# मुंबईत राष्ट्रवादी शरद पवार गटाला खिंडार

### जागावाटपाच्या वादातून जिल्हाध्यक्षांसह शेकडो कार्यकर्त्यांचा अजित पवार गटात प्रवेश

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर राजकीय समीकरणे वेगाने बदलत असून, जागावाटपाच्या पेचामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मुंबईत मोठे खिंडार पडले आहे. ठाकरे बंधू यांच्याशी शरद पवारांनी केलेल्या युतीत राष्ट्रवादीला अवघ्या 10 ते 12 जागा मिळाल्याने पक्षांतर्गत नाराजी उफाळून आली आहे. यामुळे अनेक इच्छुक उमेदवारांनी आता अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची वाट धरली असून, मुंबईत स्वतंत्रपणे लढणाऱ्या अजित पवार गटाने तब्बल 100 जागांवर उमेदवार उतरवण्याची तयारी सुरू केली आहे.

ईशान्य मुंबईचे जिल्हाध्यक्ष आणि माजी नगरसेवक धनंजय पिसाळ यांनी आज आपल्या शेकडे समर्थकांसह अजित पवारांच्या राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. विक्रोळीतील प्रभाग क्रमांक 111 मधून पिसाळ लढण्यास इच्छुक होते, मात्र ठाकरे-मनसे युतीमध्ये ही जागा संजय राऊत यांचे बंधू संदीप राऊत यांच्यासाठी सुटण्याची दाट शक्यता असल्याने पिसाळ यांनी पक्षाला सोडचिट्टी दिली. पिसाळ यांच्यापाठोपाठ माजी नगरसेविका मनीषा रहाटे आणि दक्षिण मध्य मुंबईचे जिल्हाध्यक्ष आरिफ सय्यद हे देखील अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याची दाट चर्चा आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत सध्या युत्या आणि आघाड्यांचे चित्र पूर्णपणे बदलले असून राजकीय समीकरणे कमालीची गुंतागुंतीची झाली आहेत. विशेषतः शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने 52 जागांची मागणी केली होती, परंतु ठाकरे बंधूंच्या युतीमध्ये त्यांच्या पदरात केवळ 10 ते 12 जागाच पडल्या आहेत. या अल्प जागावाटपामुळे अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांची तिकिटे कापली गेल्याने पक्षात मोठी नाराजी पसरली असून, या संधीचा फायदा उठवत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने मुंबईत 100 जागांवर



स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतला आहे.

शरद पवार गटातील अनेक नाराज नेते आता अजित पवार गटात प्रवेश करत असून, त्यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता बळावली आहे. दुसरीकडे, काँग्रेसने 'वंचित बहुजन आघाडी'सोबत नवी युती करत आपली स्वतंत्र चूल मांडली आहे. या सर्व राजकीय उलथापालथीचा केंद्रबिंदू आता विक्रोळीचा प्रभाग 111 ठरण्याची चिन्हे असून, येथे संदीप राऊत विरुद्ध धनंजय पिसाळ असा सामना रंगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# सुप्रिया सुळे म्हणाल्या- गौतम भाई मोठ्या भावासारखे अदानी म्हणाले- शरद पवार माझे मार्गदर्शक

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

नवी दिल्ली : "गौतम भाई आणि प्रीती भाभी हे माझ्यासाठी केवळ पाहुणे नसून, ते माझ्या हक्काच्या मोठ्या भावासारखे आणि वहिनीसारखे आहेत. गेल्या 30 वर्षांपासून आमचे प्रेमाचे आणि विश्वासाचे नाते आहे," अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अदानी कुटुंबाविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात गौतम अदानी आणि प्रीती अदानी यांचे स्वागत करताना त्या बोलत होत्या.



बारामतीमध्ये शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स सेंटरचे आज उद्योगपती गौतम अदानी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्य पाहुणे म्हणून गौतम अदानी हे उपस्थित होते. यावेळी गौतम अदाणी यांच्या पत्नी देखील सोबत होत्या. त्याचबरोबर शरद पवारांसह अजित पवार, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे आणि युगेंद्र पवार हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स सेंटरच्या उद्घाटनावेळी सुप्रिया सुळे यांनी गौतम अदाणी यांच्या कार्याचे कौतुक केले.

सुप्रिया सुळे यांनी बारामतीमध्ये विद्या प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात गौतम अदानी आणि प्रीती अदानी यांचे मनापासून स्वागत केले. 'गौतम भाई आणि प्रीती भाभी माझ्यासाठी मोठ्या भावासारखे आणि वहिनीसारखे आहेत, असे म्हणत त्यांनी अदानी कुटुंबाशी असलेल्या ३० वर्षांच्या जिव्हाळ्याच्या संबंधांचा उल्लेख केला.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, कधी आयुष्यात चांगली, गोड किंवा कडुही बातमी मी हक्काने कुठल्या भावाला सांगते, तर या भावाला (गौतम अदाणी) सांगते. कधी कधी ते मला हक्काने रागावतातही, तर कधी माया देखील करतात. असे आमचे प्रेमाचे आणि विश्वासाचे नाते आहे. आज गौतम भाई देशात नाही, तर जगामध्ये यशस्वी झालेत, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. गौतम भाईंचा सुरुवातीपासूनच संघर्ष आम्ही कुटुंब म्हणून फार जवळून पाहिलेला आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर (AI) भाष्य करताना सुप्रिया सुळे यांनी तंत्रज्ञान आणि मानवी संवेदना यांची तुलना केली.

"आजच्या युगात कॉम्प्युटर कितीही प्रगत झाला, तरी तो कधीही शिक्षकाची जागा घेऊ शकणार नाही. कारण तो संस्कार आणि मायेची थाप देऊ शकत नाही. तसेच संसदेतील भाषणांसाठी चॅट जीपीटीचा वापर कसा होतो, याचाही त्यांनी किस्सा सांगितला. अदानी ग्रुप आणि विद्या प्रतिष्ठान यांच्यातील कराराद्वारे संशोधन आणि कौशल्य विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.गौतम भाई नेहमीच बारामतीत येतात.

# एकनाथ शिंदेंना मुंबईत मोठा धक्का:सख्खे भाचे आशिष मानेंचा अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश, उमेदवारीही निश्चित!

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई- आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच राजकीय पक्षांनी जागावाटप तसेच उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. मुंबई महापालिकेवर सत्ता स्थापन करण्यासाठी सर्वच पक्षांमध्ये रस्सीखेच सुरू असून महायुतीमध्ये यावरून अंतर्गत मतभेद देखील होत असल्याचे बोलले जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आता मुंबईत मोठा धक्का बसला आहे. शिंदेंचे सख्खे भाचे आशिष माने यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. मुंबई कार्याध्यक्ष सिद्धार्थ कांबळे यांच्या उपस्थितीत आशिष माने यांनी प्रवेश केला आहे.

एकनाथ शिंदे यांचे सख्खे भाचे आशिष माने यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला असून त्यांना चांदिवली मतदारसंघातील प्रभाग क्रमांक 159 मधून उमेदवारी देखील देण्याचे निश्चित करण्यात आले असल्याचे समजते. त्यामुळे एकनाथ शिंदे यांना हा मुंबईत मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे. या घटनेवरून महायुतीमध्ये अंतर्गत वाद देखील निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आशिष माने यांच्यासह भाजपच्या माजी महामंत्री नेहा राठोड यांना देखील राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी देण्याचे ठरवले आहे. नेहा राठोड यांना प्रभाग क्रमांक 156 मधून उमेदवारी देण्यात आली आहे.




राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी राजकीय रणधुमाळी सुरू झाली असून, 23 डिसेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे. अर्ज भरण्यासाठी आता केवळ 30 डिसेंबरपर्यंतची मुदत शिल्लक असल्याने इच्छुकांची मोठी लगबग पाहायला मिळत आहे. या निवडणूक वेळापत्रकानुसार, 31 डिसेंबरला अर्जांची छाननी होईल, तर 2 जानेवारीपर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येतील. 3 जानेवारीला निवडणूक चिन्हांचे वाटप आणि उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर, 15 जानेवारीला प्रत्यक्ष मतदान पार पडणार असून 16 जानेवारीला या निवडणुकांचा निकाल जाहीर होणार आहे.

मतदानाला अवघे 18 दिवस उरले असतानाही महायुती आणि महाविकास आघाडीतील जागावाटपाचा तिढा अद्याप पूर्णपणे सुटलेला नाही. केवळ ठाकरे बंधूंच्या युतीची अधिकृत घोषणा झाली असली, तरी इतर प्रमुख पक्षांमध्ये जागावाटपाचे त्रांगडे अद्याप कायम आहे. मुंबईसह राज्यातील बहुतांश ठिकाणी शिंदे यांची शिवसेना आणि भाजप एकत्रित लढण्याची चिन्हे आहेत, तर पुण्यात राष्ट्रवादी विरुद्ध भाजप असा सामना रंगण्याची शक्यता आहे. `

# सोशल मीडिया, सीसीटीव्हीच्या माध्यमातून घेतला महिलेचा शोध..

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**



बुलडाणा : पाटल्या विकून मिळालेल्या कष्टाच्या पैशांचे पाकीट नकळत पडल्याने हवालदिल झालेल्या एका कष्टकरी माऊलीला सोशल मीडियाच्या मदतीने शोधून तिचे पैसे प्रामाणिकपणे परत करण्यात आल्याची हृदयस्पर्शी घटना २६ डिसेंबर रोजी साखरखेर्डा येथे घडली.शिंदी (ता. साखरखेर्डा) येथील सखुबाई जनार्दन मारके या महिला सकाळी सुमारे ११ वाजता साखरखेर्डा येथे आल्या होत्या. त्यांना घरकुल मंजूर झाले असून घराचे काम सुरू आहे. कामासाठी पैशाची गरज भासल्याने त्यांनी स्वतःच्या हातातील चांदीच्या पाटल्या सोनाराच्या दुकानात मोडल्या. त्यातून त्यांना ७ हजार रुपये मिळाले.बाजारातून परत येताना सखुबाई या सेवानिवृत्त केंद्रप्रमुख कैलास ढोलेकर यांच्या घराजवळ काही वेळ बसल्या. त्यांनी त्यातील ५ हजार रुपये एका पाकिटात ठेवले,

तर २ हजार रुपये बाजारासाठी वेगळे काढले. मात्र पाकीट पिशवीत ठेवताना ते नकळत खाली पडले. याची त्यांना जाणीव झाली नाही आणि त्या थेट घरी जाण्यास निघाल्या.थोड्याच वेळात एका महिला ग्राहकाला ते पाकीट जवळील ब्युटी पार्लरमध्ये येताना आढळले. तिने ते पाकीट उचलून अनुजा ढोलेकर यांच्या स्वाधीन केले. पाकीट कुणाचे असावे, याची चिंता सर्वांनाच लागली. पार्लरमधील महिलांनी पाणी पिण्यासाठी थांबलेल्या आजींचेच हे पाकीट असावे, असा अंदाज व्यक्त केला.नंतर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची पाहणी केली असता, ते पाकीट सखुबाई मारके यांचेच असल्याचे स्पष्ट झाले.

# मंगेश काळोखे हत्या प्रकरण:आमदार महेंद्र थोरवेंचे सुनील तटकरेंवर गंभीर आरोप, म्हणाले- तटकरेंचा पोलिसांवर दबाव

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

खोपोली नगरपालिकेच्या शिंदे सेनेच्या नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांच्या निर्घृण हत्येमुळे रायगड जिल्ह्यातील राजकीय वातावरण प्रचंड तापले आहे. या प्रकरणातील नऊ आरोपींना न्यायालयाने 5 जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली असली तरी, यावरून आता शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. आमदार महेंद्र थोरवे यांनी थेट खासदार सुनील तटकरे यांच्यावर पोलिसांवर दबाव आणल्याचा खळबळजनक आरोप केला आहे, तर तटकरे यांनी या प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याची मागणी केली आहे.

आमदार महेंद्र थोरवे यांनी या हत्येमागे राजकीय षडयंत्र असल्याचा संशय व्यक्त केला आहे. राष्ट्रवादीच्या आरोपींना अटक होऊ नये यासाठी खासदार सुनील तटकरे पोलिसांवर दबाव आणत आहेत, असा थेट आरोप थोरवे यांनी केला. हत्येचा सूत्रधार 'सुतारवाडी'त (सुनील तटकरे यांचे निवासस्थान) बसला असून, जोपर्यंत सर्व आरोपींना अटक होत नाही आणि त्यांना फाशीची शिक्षा मिळत नाही,

तोपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच, या प्रकरणातील गुन्हेगारांवर 'मकोका' लावण्याची मागणी त्यांनी केली असून काळोखे कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे स्पष्ट केले.

एसआयटी चौकशीतून कोणी काय केले हे समोर येईलच- सुनील तटकरे

महेंद्र थोरवे यांच्या आरोपांनंतर खासदार सुनील तटकरे यांनी तातडीने कर्जतमध्ये धाव घेत राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या हत्येचे आम्ही समर्थन करत नाही, मात्र या घटनेचे राजकारण करणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे की सत्य लवकरच बाहेर येईल, असे तटकरे म्हणाले. या प्रकरणाची पारदर्शक चौकशी व्हावी यासाठी आपण स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एसआयटी चौकशीची मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. कोणी काय काय केले आहे, हे चौकशीतून समोर येईलच. मी योग्य वेळी यावर सविस्तर बोलेन, असा इशारा देत त्यांनी कार्यकर्त्यांना संयम बाळगण्याचे आवाहन केले.

